म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 1223

५८
२

# सहकार

( शक्ति, शास्त्र आणि साधना )

लेखक

**श्री. गो. भांबूरकर,**


एम. ए., एल. एल. बी., एफ. आर. ई. एस., एफ. एस्. एस.,
एफ. इन्स्टि. डी. ए. एम. बी. आय. एम., ए. एम. आय.
आय. ए. (लंडन) औद्योगिक अर्थशास्त्रज्ञ व व्यवस्थापन तज्ञ.
" हिशेब निर्दशिका " कर्ते पुणें ५.

REFBK-0010232
REFBK-0010232

मूल्य २ रुपये

નિ

રખડુકર નિબંધ
૧૨૨૩ ૨૫/૩/૬૦



# स ह का र

( शक्ति, शास्त्र व साधना )

म. ग्रं. संग्रहालय ठाणे
अ. क्र. 90232
ग्रं. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

लेखक

श्री. गो. भांद्रूरकर,

एम. ए., एलएल. बी., एफ. आर. ई. एस., एफ. एस. एस.,
एफ. इस्टि. डी. ए. एम. बी. आय. एम., ए. एम. आय.
आय. ए. (लंडन) औद्योगिक अर्थशास्त्रज्ञ व व्यवस्थापन तज्ञ.
" हि

REFBK-0010232

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 26563 विः निबंध
क्रमांक 1223 नों: दि: 26/3/68

दीपगृह प्रकाशन, नागपूर

प्रकाशक :
एस्. भांबूरकर,
दीपगृह प्रकाशन, लक्ष्मी विलास,
जेल रोड, नागपूर १

सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे आधीन

प्रथमावृत्ति : मे १९५९

मुद्रक :
बा. गो. ओगले, बी. ए.,
नक्षत्र प्रेस, ओगले रोड,
महाल, नागपूर २.

वाचकांस—

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व व्यवहारतज्ञ श्रीनिवास गोपाळ भांबूरकर यांच्या ललित लेखणींतून उतरलेले व माननीय डॉ. पंजाबराव देशमूख, श्री. वैकुंठभाई मेहता, व डॉक्टर यु. ए. शेख, आय. ए. एस. रजिस्ट्रार को-आपरेटिव्ह सोसायटीज, मुंबई राज्य यांनी गौरवलेलें व पुरस्कारलेले सहकार–शक्ति, शास्त्र व साधना हें पुस्तक वाचकांना सादर करण्यास आम्हांला अतिशय आनंद होत आहे. या ग्रंथाचें वाचनाने मराठी वाचकांना सहकारी तत्त्वांची पूर्ण ओळख होऊन महाराष्ट्राच्या उद्धाराचे एक नवीन तंत्र त्यांच्या हातीं येईल अशी आम्हास खात्री वाटते.

नागपूरच्या कांग्रेस अधिवेशनानें 'सहकार' या विषयाला विशेष प्राधान्य दिल्यामुळें अनेक संस्था व व्यक्तींकडून या ग्रंथाचे प्रकाशन शक्य तितक्या लवकर व्हावे अशी इच्छा प्रदर्शित केली गेली. यावेळीं कागदाचें दुर्भिक्ष्य असल्यामुळें प्रकाशनाच्या किंमतीवर आमचें नियंत्रण राहूं शकलें नाहीं.

नक्षत्र प्रेसने इतर कामें बाजूला सारून आपुलकीच्या भावानें या ग्रंथाचे मुद्रण अल्पावधींत करून दिल्याबद्दल तो धन्यवादास पात्र आहे. या पुस्तकांत कांही मुद्रणदोष आढळल्यास ते वेळेच्या निकडीमुळें राहिले आहेत. तरी क्षमस्व.

हा ग्रंथ जितक्या विस्तृत प्रमाणांत महाराष्ट्रांत वाचला जाईल व त्यामुळें महाराष्ट्रांतील सहकारी जीवन सुकर होईल तितक्याच प्रमाणांत समाधानाचा वाटा आम्हाला मिळेल.

अक्षय्यतृतिया, १९५९
लक्ष्मीविलास,
जेल रोड, नागपूर.

दीपगृह प्रकाशन

# प्रस्तावना

सहकारी चळवळीपासून अलिप्त असलेल्या श्री. भांबूरकर यांनीं लिहिलेलें हें पुस्तक माझ्यासारख्या सहकारी जीवनवृत्तींत मुरलेल्या व्यक्तीला विशेष स्वागतार्ह वाटते. त्यांनी केलेलें विवेचन सहकारी चळवळी बाहेर अजूनही असलेल्या बहुसंख्य व्यक्तींच्या मनाची पकड घेतल्यावाचून राहणार नाहीं. विषयाची मांडणी व विवेचन पद्धति आजपर्यंतच्या प्रकाशनापेक्षां नाविन्यपूर्ण असूनही विषयाचा उहापोह सर्वांगसुंदर झाला आहे हें या पुस्तकाचें वैशिष्टच म्हणून सांगता येईल.

सामान्य व्यक्तींचा आर्थिक विकास हा सहकारी चळवळीचा सर्वसंमत उद्देश आहे. परन्तु श्री. भांबूरकर यांच्या मतें सहकाराचें कार्यक्षेत्र याहिपेक्षा विशाल असून समाज जीवनांतील अशी एकही बाब नाहीं कीं जिथे सहकारी रचना उपयुक्त ठरणार नाहीं. ही भूमिका स्वीकारून श्री. भांबूरकर यांनीं परंपरागत सहकारी विचारवंतापेक्षा एक पाऊल पुढें टाकलें आहे हें निःसंशय. अर्थातच आर्थिक विषमता व समाज शोषणारांची खोलवर रुजलेली पाळेमुळें नष्ट करण्यासाठीं सहकाराचा अधिक उपयोग होईल यांत शंका नाहीं.

'सहकार आणि ग्रामदान' हें प्रकरण लिहून लेखकानें सहकाराचें एक नवीन दालन प्रकाशांत आणले आहे.

यालवल येथें सर्वपक्षीय पुढाऱ्यांची आचार्य विनोबाजींशीं जी चर्चा झाली त्या निमित्त काढलेल्या पत्रिकेंत ग्रामदानाची पूर्ति सहकारांत व्हावी यावरच भर देण्यांत आला होता. या पुस्तकांत ग्रामदान व सहकार यांचा परस्परपूरक मेळ कसा घालता येईल याचें चित्रण चांगलें केलें आहे. त्यापासून ग्रामीण जीवनांत चैतन्ययुक्त समाजवादी रचना सहकारांतून कशी उत्स्फूर्त होईल हें सहज समजतें.

बंगलोर,
गांधी जयंती,
२ ऑक्टोबर १९५८

वैकुंटलाल मेहता

## पुरस्कार :

मध्यवर्ति सहकार मंत्रि,
हिंदुस्थान सरकार,
१२ जनपथ, नवी दिल्ली
५ डिसेंबर १९५८

श्री. श्री. गो. भांबूरकर ह्यांनी बऱ्याच प्रयासानें लिहिलेलें सहकार हें पुस्तक मी पाहिलें. असल्या संक्षिप्त पण सहकारी चळवळीच्या अनेक अंगावर प्रकाश पाडणाऱ्या पुस्तकाची आवश्यकता होती ह्यांत कांही शंका नाहीं. श्री. भांबूरकर ह्यांना अभ्यासाचा व्यासंग आहे व तसेंच निरनिराळ्या देशांतील सहकारी चळवळीची माहितीही त्यांनी प्राप्त करून घेतली आहे. हें पुस्तक लिहिण्यांत त्यांनी ह्या दुहेरी सामुग्रीचा अत्यंत चांगला उपयोग करून सहकारी चळवळींत भाग घेणाऱ्या लोकांची एक फार मोठी गैरसोय दूर केली याबद्दल त्यांचे अभिनंदन करुन त्यांचा हा प्रयत्न सफल व अत्यंत लोकोपयोगी होवो ही माझी मनापासून इच्छा आहे व तसे होईल ह्याबद्दल विश्वास वाटतो.

पंजाबराव देशमुख

## पुरस्कार :

'सहकारा' वरील मराठींतील पुस्तकांची संख्या फारशी नाहीं आणि त्यांतहि सामान्य वाचकांसाठीं लिहिलेली पुस्तकें बोटावर मोजण्याइतकीच भरतील. श्री. भांबूरकरांनी या छोटयाशा पुस्तकांत सहकाराच्या विविध अंगांचा स्वतंत्रपणें उहापोह केला आहे. सहकार या शद्वाच्या अर्थापासून तो आजचे सहकाराचे जीवनव्यापी क्षेत्र, सहकारी अर्थरचना आणि सहकार व इतर आर्थिक नि सामाजिक चळवळी यावर लेखकाने थोडक्यांत पण मुद्देसूद विवेचन केलें आहे. सहकाराची व्याख्या, सहकारी कार्यपद्धति नि सहकाराचें नित्य व्यवहारांतील उपयोग लेखकाने सोदाहरण विशद केले आहेत. त्याचबरोबर सहकारी शिक्षणाची आज असलेली आवश्यकता पण प्रतिपादन केली आहे. पुस्तकाची भाषा सोपी व सुंदर आहे. हें पुस्तक सामान्य वाचकांना व त्याचबरोबर सहकाराचा प्राथमिक अभ्यास करणाऱ्यांना खात्रीने उपयुक्त ठरेल.

डॉ. ए. यू शेख
एम. ए., पी. एच. डी.,
आय. ए. एस.
रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज्,
मुंबई राज्य, पुणें-१

पुणें-१
१ नोव्हेंबर ५८

# अर्पण पत्रिका

ज्यांच्या सहकाराशिवाय महाविदर्भातील सामाजिक
व औद्योगिक जीवन समृद्ध होण्यास अडचण
पडली असती व ज्यांच्या अकाली
निधनानें समाज जीवनाची
न भरून निघणारी हानी झाली
त्या नागपूरच्या



**कै. पूर्णचंद्र गोपाळराव बुटी**
यांच्या पवित्र स्मृतीस
हें पुस्तक कृतज्ञतापूर्वक सादर व सप्रेम समर्पण.

पुणें ५.
१०-१२-५८. श्री. गो. भांबूरकर

# निवेदन

आपला भारत हा एक अतिप्राचीन महान देश आहे. पाश्चिमात्य राष्ट्रें त्याला मागासलेला मानतात, याचें कारण त्यांची वैचारिक भूमिकाच वेगळी आहे. महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे किंवा पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या जगद्वंद्य नेत्यांच्या नवविचारांना जी जनता समजू शकते त्या जनतेला मागासली मानणें असमंजसपणाचें होईल.

परंतु भारतांतील जनता गरीब आहे हें सत्य. राज्यकर्त्यांनीं तिच्या पुनरुत्थानाकरितां चालविलेल्या भगिरथ प्रयत्नांचे पुरेसें फळ चालू वेगानें तिच्या पदरीं पडावयास कदाचित अर्धशतकहि अपुरे पडेल. हें काम जलदगतीनें व्हावयाचें असल्यास तिला 'सहकार' प्रवृत्तच करावयास पाहिजे. या दृष्टीनें प्रयत्न करावयाचा झाल्यास 'सहकाराची' पूर्ण ओळख ग्रामीण जनतेला करून देणे अगत्याचें आहे. हें पुस्तक लिहिण्यांत लेखकाचा हेतूही हाच आहे.

माझ्या युरोपीय दौऱ्यांत इंग्लंड, स्वीडन, जर्मनी, स्वित्झरलंड वगैरे औद्योगिक दृष्ट्या अतिप्रगत देशांत सुद्धां सहकारानें मिळविलेलें अपूर्व स्थान पाहून व दुर्बलांना बलवान करण्याकरितां सहकाराचा प्रभावी मार्ग अभ्यासल्यानंतर शेतकीप्रधान भारताच्या ग्रामीण जीवनाचा विकास सहकारी पद्धतीनेंच शीघ्र होईल हें मला पटलें.

संस्कृतांत आम्रवृक्षाला सहकार असें नामाभिधान आहे. अमृतासारखी मधुर फळें, मंगल कार्यास शोभा म्हणून तोरणासाठीं उपयोगी पडणारी हिरवी गर्द पानें वसंतऋतूच्या स्वागतपूर्तिसाठीं आतुर झालेला परिमल युक्त बहर, वाटसरूंचा श्रमपरिहार करण्यासाठीं मार्गा-वर नित्य उभारलेला शीतल छायेचा नैसर्गिक मंडप व असल्याच अनेक प्रकारांनीं मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या या वृक्षाला भारतांत मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. या गिर्वाण सहकाराची मराठी आवृत्तिही मानवी जीवन समृद्ध सुखकर व सुगंधी करण्याकरितांच अवतरली आहे. यांत मुळींच शंका नाहीं.

सहकारी चळवळींत मानाचें स्थान भूषविणारे मध्यवर्ति शेती व सहकारमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख भारतांतील सहकारी चळवळीचे अध्वर्यू व तपस्वी श्री. वैकुंठभाई मेहता, तसेंच मुंबई राज्य सहकारी खात्याचे रजिस्ट्रार डॉ. यू. ए. शेख, आय. ए. एस. या तीन थोर व्यक्तींचे आशीर्वाद या पुस्तकाला मिळाले यांतच त्याच्या यशाचें बीज आहे. या सद्कृतीबद्दल त्यांना शतशः धन्यवाद.

शेवटीं सहनाववतु । सहनौभुनक्तु । सहवीर्यं करवावहै । या वैदिक मंत्रांतील आदेशानुरूप आपण सर्व एकत्र येऊन पराक्रमासाठीं सिद्ध होऊं या, ही विनंती भारतीय जनतेला करणेंच उचित ठरेल. हें आवाहन उद्धारासाठीं आतुर असलेले भारतीय वाचक स्वीकारतील यांत तिळमात्र शंका नाहीं.

पुणें ५,
१०-१२-५८

श्री. गो. भांबूरकर

# अनुक्रमणिका

| क्र. | प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | सहकाराचा अर्थ | .... | १ ते ७ |
| २. | सहकाराचे कार्यक्षेत्र | .... | ८ ते १३ |
| ३. | सहकाराची आवश्यकता | ... | १४ ते १८ |
| ४. | सहकारापासून फायदे | .... | १९ ते २३ |
| ५. | सहकाराची जोपासना | . | २४ ते ३१ |
| ६. | सहकारी शिक्षण | .... | ३२ ते ३८ |
| ७. | सहकार व सरकार | .... | ३९ ते ४७ |
| ८. | सहकारी आर्थिक रचना | ... | ४८ ते ५३ |
| ९. | सहकार आणि ग्रामदान | ... | ५४ ते ६० |
| १० | परिशिष्ट | | |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 26563 वि: 
क्रमांक 1223 नों: दि: 26.3.66
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 90232

## १. सहकाराचा अर्थ

सहकार हा शब्द अतिशय सुंदर आहे. सुंदर म्हणावयाचे कारण त्यांत विधायकतेची सूचना आहे व सांघिक जीवनाचें तत्व आहे. क्रियाशीलता जीवनाला प्रगत मार्गावर नेणारी म्हणजेच चेतना आहे. सामुदायिक जीवनांत चैतन्य उत्पन्न करणारें सारें सुंदर नाहींतर दुसरें काय ?

सहकार हा शब्द 'सह' आणि 'कार' या दोन शब्दांचा बनला आहे. त्यांतील 'सह' या शब्दाचा अर्थ एकत्रित येवून किंवा सांघिकतेनें किंवा मिळून; तसेंच 'कार' हा शब्द 'कृ' या संस्कृत धातूपासून बनला असून त्याचा अर्थ क्रियाशील असा आहे. शिल्पकार म्हणजे शिल्पकृति करणारा, सुवर्णकार म्हणजे सोन्याचे काम करणारा. तसेंच सहकार म्हणजे एकत्रितपणें कार्य करणारा (समाज अथवा गट) असा अर्थ साहजिक निघतो. वाच्यार्थानें जरी हा अर्थ होत असला तरी रूढार्थानें मात्र सहकार

हा शब्द विशिष्ट तऱ्हेनें एकत्रित येवून कार्य करणाऱ्यांना लावण्याचा प्रघात पडला आहे. सहकारी चळवळ सरकारनें घालून दिलेल्या विशिष्ट धोरण आणि नियमानें काम करणाऱ्यांची चळवळ, सहकारी खाते म्हणजे सहकारी चळवळींत काम करणाऱ्या व्यक्ति आणि सस्था यांच्या कामावर देखरेख करून त्यांना मार्गदर्शन वा मदत करण्याकरितां उघडलेली सहकारी कचेरी वगैरे शब्दप्रयोगावरून हें उघड आहे कीं सर्वच एकत्र येवून केलेलें प्रयत्न सहकारी चळवळींत मोडणार नाहींत. सरकार ज्याला सहकार मानते तो विशिष्ट पद्धतीचा आहे.

कार्य करण्याकरितां एकत्र येणें व सांघिक रीतीनें कार्य करणें हीच सहकाराकडून अपेक्षा. एकत्र येवून विधायक कार्य करण्याचा सहकाराचा संकल्प असल्यामुळें विघातक कार्यासाठीं सहकाराची योजना असंभव. त्यामुळें निर्मिती, वाटप, वाहतूक, पतपेढ्या वगैरे सारख्या जीवनोपयोगी संस्था सहकारी चळवळींत प्रामुख्याने दिसतात. उलट युद्धांत जरी एकमेकांचें साह्य लागत असले व तें मिळत असलें तरी युद्ध हें कधींहि सहकारी चळवळीचें अंग होवूं शकणार नाही. कारण तें एक विघातक कृत्य आहे. विनाश हें त्याचें ध्येय आहे.

**सहकाराची व्याख्या:**

माझ्या मतें सहकाराची व्याख्या येणें प्रमाणें :

" विधायक ध्येयासाठीं परस्पराविषयीं आदरभाव व विश्वास बाळगून, एकत्रित झटणें ".

सहकाराच्या व्याख्या अनेक अर्थ-शास्त्रज्ञांनीं अनेक तऱ्हेनें दिलेल्या आहेत. परंतु सहकाराच्या सर्व अंगांचें एकविध दर्शन जितके वरील व्याख्येंत आढळते तितकें तें इतरत्र आढळत नाहीं.

वरील व्याख्येची फोड केल्यास आपणांस तीन महत्वाचे मुद्दे आढळतात. सहकारांत

(१) विधायक ध्येय पाहिजे;

(२) परस्पराविषयीं आदरभाव व विश्वास वाटावयास पाहिजे;

(३) एकत्रित झटावयास पाहिजे;

या वरून हें निश्चित कीं सहकाराला ध्येयाची आवश्यकता आहे. सर्व कार्योन्मुख मंडळीचें ध्येय एकच असावें लागते. जर ध्येय भिन्नता असेल, मार्ग व कार्य पद्धतींत फरक पडेल, तर सहकार अशक्य होईल.

ध्येय हें व्यापक स्वरुपाचे असून त्यांत अनेक उद्दिष्टें समाविष्ट झालेली आढळून येतील. त्यामुळें उद्दिष्टें अनेक असून देखील ध्येय एकच संभवते. समजा एखाद्या गांवांतील लोकांनीं स्वावलंबी व्हावयाचें ठरविलें तेव्हां त्यांनीं त्या करितां निर्माण केलेल्या संघटणेचें स्वावलंबन हें ध्येय

होईल. हें ध्येय साधण्यासाठीं त्यांना लागणाऱ्या आवश्यक वस्तू निर्माण कराव्या लागतील, त्यांच्या वाटपाची व्यवस्था करावी लागेल. तसेंच अनेक सेवांचें. गांवांत तेली नसल्यास तेलाचा घाणा चालवावा लागेल, कुंभार नसल्यास आवश्यक तीं मातीचीं भांडी तयार करावीं लागतील, किंवा दुसऱ्या गांवच्या कुंभाराला आपल्या गांवीं वस्तीस आणून मडकीं घडवावयास सांगावें लागेल; किराणा माल विकणारा दुकानदार जर जास्त नफा घेवून माल वाईट प्रतीचा देत असेल तर एखादें किराणा मालाचे दुकानहि काढावें लागेल. सुतार, लोहार, धोबी व न्हावी गांवांत असल्यास उत्तमच नाहींतर त्या बाबींतील उणीव भरून काढण्यासाठीं वेगळे प्रयत्न करावे लागतील तेव्हां स्वावलंबनाचे ध्येय गाठण्यासाठीं त्या गांवाला आवश्यक असलेल्या वस्तूंचा अथवा सेवांचा पुरवठा व्हावयासाठीं झटले पाहिजे. याचाच अर्थ असा कीं अनेक उद्दिष्टें साधावी लागतील तेव्हांच ध्येय प्राप्ती झाली म्हणून समजतां येईल.

ध्येय हें विधायक पाहिजे; विघातक नको. जीवन जगावयाचें असेल तर अशीं कांहीतरी कृति हातून घडली पाहिजे कीं जिच्यामुळें त्या जगण्यास मदत होईल. जगण्याची आवश्यकता पडली असेल तर या मदतीची गरजहि चटकन ध्यानांत येईल. तेव्हां जीवनास पोषक असेंच ध्येय सहकारी मंडळींनी उराशी बाळगले पाहिजे. जीवनविकास हेंच विधायकतेचें लक्षण. आपण चालविलेल्या कार्यामुळें जीवनाचा विकास झाला पाहिजे; कल्याणांत भर पडली

पाहिजे. अशी वृत्ति बाळगली व कृति हातून घडली म्हणजे सहकारी चळवळीला समाजाचा पाठिंबा मिळेल; ती वाढीला लागेल. बी पेरलें तर सुंदर रोपटें तयार होईल; तें फुलेल, फळेल व त्यामुळें जीवनोपयोगी द्रव्यें जगाला मिळतील. परंतु दगड पेरल्यास श्रम वाया जातील. इतकेंच नव्हे तर पुढें मागें त्यावर लोटलेली माती वाहून गेल्यावर ठेच लागण्यापुरतांच त्याचा उपयोग होईल. पहिलें विकासक्षम तर दुसरें वांझोटे वा विघातक.

अशा प्रकारें ध्येय निश्चिती झाल्यानंतर त्याच्या सिद्धिसाठीं एकत्रितपणें झटले पाहिजे. आपणांपैकीं ग्रामीण जीवनाशीं ज्यांचा संबंध आहे त्यांना हें माहित आहे कीं गाडीला जोडलेले बैल समोर ओढण्याऐवजीं बाजूला अथवा मागेंपुढें ओढूं लागले तर गाडीची प्रगति समाधान-कारक होत नाहीं. त्यांची शक्ति एकत्रित होवून गाडी खेचण्याऐवजीं ती परस्पर विरोधी बनते. तसेंच मोटार-गाडीच्या चार चाकापैकीं कांही यांत्रिक दोषामुळें एकाच चाकाला ब्रेक जास्त घाशीत असेल तर ती गाडी पूर्ण ताकतीनें पुढें जावूं शकत नाहीं. एकाच बाजूला ओढली जाईल. परंतु हा दोष काढून टाकल्या बरोबर गाडीची शक्ति वाढते व त्यामुळें आवश्यक तो वेगही मिळतो. तेव्हां एकत्रित येवून झटणें म्हणजे सर्व सहकारी सभा-सदांनीं त्या उद्दिष्टांकरितां आपापलें कौशल्य व श्रम खर्ची घालणे. तसेंच विरोधी वृत्तींचा लोप करणें, नायनाट करणे.

असें करीत असतां सभासदांनीं आपले वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्व संख्येच्या व्यक्तिमत्वांत विलीन करावयास पाहिजे. नाहींतर व्यक्ति तितक्या प्रकृति असल्यामुळें एकच ध्येय गांठण्याचे अनेक मार्ग सुचतील व कधींकधीं वेगवेगळे, परस्पर विरोधी आचरले जाण्याचा प्रसंग उत्पन्न होईल. अशा वेळीं एकत्र आल्यानंतर ठरलेला मार्ग सर्व संमत म्हणून त्याचें अवलंबन सर्वांनीं करावें. हाही एकत्रितपणें झटण्याचा अर्थ आहे.

अशा प्रकारें समान ध्येयासाठीं एकत्रित होऊन झटत असतांना परस्पराविषयीं आदर व विश्वास बाळगण्यास हवा. ही अत्यंत आवश्यक बाब आहे. प्रत्येक व्यक्ति स्खलनशील आहे. फक्त परमेश्वरच काय तो परिपूर्ण आहे. तेव्हां मानवांकडून चुका ह्या व्हावयाच्याच. एकमेकांकडून होणाऱ्या चुकांकडे बघतांना जर त्याला वेगळा रंग दिला गेला व नैसर्गिक हेतूपेक्षां इतर हेत्वारोप केले गेले तर ध्येयाची हानि होण्याचा संभव. तसेंच ज्या अर्थीं सर्व मंडळींनीं एकत्र प्रवास करावयाचें ठरविलें त्या अर्थीं सोबत्यापासून जास्तींत जास्त निर्भयता वाटावयास पाहिजे, आणि निर्माण व्हावयास पाहिजे. त्या शिवाय साशंकतेचें वातावरण आसमंतात सतत घोटाळत राहील. अनेक चांगल्या कार्यांची हानि यामुळें झाल्याची उदाहरणें आढळून येतील.

दुसरें असें कीं सहकारी मंडळीं जाणूनबुजून व समजून उमजून एकत्र आलेली असतात. ती कांहीं आग-

गाडींतील मंडळी सारखी परस्परांशीं अपरिचित नसतात. त्यांची परस्परांशीं ओळख असते व समान ध्येयानें प्रेरीत होऊन वाट-चाल करण्याचें किंवा कार्योन्मुख होण्याचें त्यांनीं ठरविलें असतें. ही मंडळी एकाच गांवची किंवा पंचक्रोशीतली असल्यामुळें त्यांच्यांतील भरीवपणाची किंवा उणीवांची जाणीव एकमेकांना असणें साहजिक आहे. अशा वेळीं भरीवपणावर विशेष भर दिला व उणीवांची विशेषानें दखल घेतली नाहीं तर एकमेकांविषयीं आदर व विश्वास वाढेल व सहकार्याची भावना उत्तेजित होईल.

---

२.

## सहकाराचें कार्यक्षेत्र

सरकाराचे कार्यक्षेत्र जीवनाएवढें विशाल असूं शकतें. जीवनांत व्यक्तिला ज्या ज्या गोष्टी कराव्या लागतात त्या सर्व सहकारी पद्धतीनें करतां येतील. दैनंदिन जीवनांतील व्यवहार, अडी अडचणीचें वेळीं उपयोगी म्हणून, आजार दुखण्यांतील प्रसंगावर तोडगा म्हणन किंवा गांजणुकीपासून सुटकारा म्हणून सहकारी योजना आंखतां येतील. जातीय दंगलींत मोहोल्याचें संरक्षणाची जबावदारी स्वीकारून रात्रभर पाळीपाळीनें गस्त घालणाऱ्या सहकारी टोळचा परिचित आहेतच; गांवांत एखादी रोगाची साथ उदभवल्या बरोबर सर्वांनीं एकत्रितपणें तिला आळा घालण्याचा प्रयत्न केल्याची अनेक ग्रामीण उदाहरणें देतां येतील. नदीच्या पात्रांत बैलगाडी रूतली असतां तिला बाहेर काढण्याचे यशवी प्रयत्न इतर बैलगाडी वाल्यांनीं अथवा आसमंतांतील लोकांनीं केल्याचें आपणापैकीं सर्वांना माहित आहे. उन्हाळयांत गांवची

विहीर कोरडी होण्याची चिन्हें दिसूं लागतांच तिला खोल करण्याकरितां अनेक गांवकरी हिरीरीनें पुढें येतात. तसेंच लावणी, रोवणी, कांपणी वगैरे शेतीसंबंधीं कार्यांतहि सहकाराची भावना दिसून येतें. अशा रीतीच्या सहकाराचा ग्रामीण जीवनाला परिचय आहे व तोहि सहजस्फूर्त सहकाराचा.

या सर्व प्रकारच्या क्रियांना किंवा वृत्तींना सहकार म्हणतां येईल कारण त्यांत सहकाराचें तत्व सामावले आहे. परंतु केवळ तत्वानुकूलता उपयोगी नाहीं. असल्या प्रकारच्या कोणत्याहि प्रयोगांत किंवा अनुभवांत संस्थांच्या जीवनाशी निगडित असलेलें सातत्य-नेहमीं चालणारें व टिकणारें-अवश्य असते. तें साधण्यासाठीं तत्वांबरोबर तंत्राचेंही अवधान राखावे लागते. सहकाराचे तत्व म्हणजे मानवी मनाची सहजेच्छा. जीवनांतील कलहाशी तोंड देण्याची सामुदायिक जबाबदारी. हें तत्व सहजस्फूर्त असतें परंतु स्फूर्तीला योग्य वळण दिले नाहीं किंवा तिचा आवश्यक अशा परिणामासाठीं बंदिस्त उपयोग करून घेतला नाहीं-तर ती वाया जाईल. स्फूर्ति ही शक्तिदायी आहे. शक्तीचा ऱ्हास होऊं देणे समाजाला धोक्याचे असतें. ही समाजाची शक्ति विधायक कार्यासाठीं सतत टिकेल अशा तऱ्हेनें तिचा वापर केला पाहिजे. कार्याची निवड करतांना ते सतत चालूं राहूं शकेल अशा प्रकारचीं त्याची धाटणीं असावी. लग्नसमारंभ, युद्ध किंवा भांडणे सतत चालूं ठेवणें कठिण. त्यांचा आज ना उद्या वीट यावयाचाच.

तसेंच रोगराई, आजारपण वगैरेचे. त्या उत्पन्न झाल्या-बरोबरच कधीं बंद पडतील तिकडे साऱ्यांचे लक्ष, यामुळें त्यांचाही सहकारी कार्यासाठीं उपयोग नाहीं. असें असल्या-मुळें उत्पादन, वाटप, वाहतूक, शिक्षण पत-पेढ्या वगैरे सारख्या आवश्यक विषयांत सहकाराची योजना झालेली आढळते. तेव्हां विषयांचा विचार केल्यास सहकाराचें क्षेत्र विधायक स्वरूपाच्या व सातत्यानें चालू राहतील अशा. विषयांपुरतें मर्यादित होते.

जेव्हां व्यक्तिला एखादें काम स्वत: होऊन करितां येत नाहीं, तिच्या सामर्थ्यांत कमतरता भासते, तेव्हांच ती इतरांचें मदतीची अपेक्षा करते. ही मदत एकतर मोल देऊन विकत घेतलेली असूं शकेल किंवा ती सहकाराच्या रूपानें आलेली असेल. जेव्हां ती मोलानें विकत घेतली जाते त्यावेळीं मालक-मजूर असें दोन वर्ग पडतात. भांडवलशाही कार्य प्रणालीस सुरूवात होते. त्यांत दिवसभऱ्याचे काम करून ठरलेली मजुरी पदरांत पडली म्हणजे कामाशीं अथवा मालकाशीं दुसरें नाते उरत नाहीं. मजुरी आणि मोल एवढें समीकरण सुटलें कीं झाले. त्या कामापासून मिळणारी प्रशंसा अथवा संपत्ति याचा मजुरांशीं मुळींच संबंध राहात नाहीं. मजुरीचें मोल मिळालें की, उरलेल्या सर्व प्रश्नांची जबाबदारी मोल देणारा स्वीकारतो.

सरकारी पद्धतींत व या कार्य पद्धतींत ध्येय एकच संभवूं शकते; एकत्र येवून कार्य करावे लागते हेंही खरें, परंतु सहकाराच्या व्याख्येत अंतर्भूत केलेलें एकमेकाविषयीं

आदर व विश्वासाचें वातावरण या पद्धतींत असणें दुरापास्त. याचें कारण मोलानें काम करून घेणारा काम करणाऱ्यांपेक्षां जास्त संपन्न परिस्थितींतला असलाच पाहिजे व आणखी संपन्न होण्याकरितां तो काम काढूं लागला. त्याला त्याच्या ध्येयाला अनुकूल अशीं कार्यपद्धति आखावयाची आहे. ती आखतांना काम करणाऱ्यांच्या भावना, विचार, श्रद्धा, शरीर वगैरे संबंधी आस्थेवाईक तऱ्हेनें विचार करावयाची त्याला गरजच भासत नाहीं. भोंगा झाला कीं झालें काम सुरूं. कमींत कमी ठराविक गतीनें तें झालेंच पाहिजे असा त्याचा कटाक्ष. काम जेवढें जास्त होईल तेवढा जास्त नफा त्याचे पदरांत पडून संपन्नतेचें त्याचें स्वप्न लवकर साकार होत असल्यामुळें तो दिवसें दिवस कामाचा वेग वाढविण्याचाच विचार करील व तितक्यांच वेळांत जास्तींत जास्त काम कसें काढतां येईल याचे मार्ग शोधून काढील ही भांडवलशाहीची रीत संपत्तीच्या लालसेंतून निर्माण झाली आहे. आधुनिक युगांत संपति व सत्ता ह्या दोनच देवता बनल्या आहेत. संपत्ती पासून जास्त सत्ता व सत्तेपासून अधिक संपत्ति अशी परस्परानुकूल वाटचाल चालूं आहे. जोपर्यंत मानवी मूल्यांची समाजास पूर्ण ओळख पटत नाहीं तों पर्यंत हीं आर्थिक मूल्येंच समाज जीवनावर सत्ता गाजवितील हें निःसंशय.

सहकाराचा मार्ग मात्र याहून भिन्न आहे. ज्या अर्थी आपण सर्व लहान आहोंत व आपणापैकीं कुणाजवळही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. 
अनुक्रम २६५९३ विः १ नंवांधं
क्रमांक 9223 नों: दि: 20/3/60

वैयक्तिक रीतीनें कल्याणकारी ध्येय गाठण्याचें सामर्थ्य व साधनें नाहींत त्या अर्थी आपण सर्वजण एकत्र येवून अशीं एक शक्ति निर्माण करूं या कीं जी आपणास साधनें उपलब्ध करून देईल, सामर्थ्य उत्पन्न करील व ध्येय मार्गावर पाठपुरावा करील. गवताची एकेक काडी अगदीं क्षूद्र असते परंतु त्यांचा चांगला दोर वळला तर मस्त हत्तीला देखील तो जागचा हलूं देणार नाहीं. निर्बल अशा अनेक व्यक्तींचा संघ एकजीवित्वानें सबल होवून आत्मोन्नतीसाठीं प्रयत्न करतो व हा प्रयत्न म्हणजेच सहकार. आधुनिक जगांत आर्थिक प्रश्नच सर्वात जास्त महत्वाचे. ते सोडविण्यासाठीं प्रयत्न करावयाचा म्हट-ल्यास अनेक अडचणी दत्त म्हणूनच समोर उभ्या राहतात. त्या क्षेत्रांत अगोदर काम करणाऱ्या व्यक्ति व संस्था चढाओढ सुरूं करतात व नवीन येणाऱ्यांची लवकरच हकालपट्टी करण्याकरितां कारवाया करितात. सहकारी दुकान बंद पडावे म्हणून त्याच्यापेक्षां स्वस्त दरानें माल विकावयास सुरूवात करतात, उधारीची मर्यादा वाढ-वितात, जाहिरातबाजी करून गिऱ्हाईक आपलेकडे वळवून त्या दुकानाचा कोंडमारा करितात किंवा उत्पादकांशीं संगनमत करून त्या सहकारी दुकानदाराला माल न मिळेल अशी व्यवस्था करतात. अशा या समाज शोषणानें गब्बर झालेल्या व चढाओढीस उभ्या असलेल्या राक्षस-स्वरूपापुढें टिकाव लागावयाचा असेल तर मानवाला एकजुटी शिवाय अन्य मार्ग नाहीं. कल्याणाचे ध्येय

गाठावयाचें असेल तर एकजुटीवरच नेत्र खिळले पाहिजेत. निर्बलांना बलवान करणारी ही एकसंघता आधुनिक जगांत सहकाराच्या रूपानें वरदानच ठरली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यामुळें जेथें जेथें निर्बलांचे कल्याणकारी ध्येय आहे तेथें तेथें सहकाराचे क्षेत्र आहेच म्हणून समजावें. याच अर्थानेंही सहकाराला विश्व-व्यापकता प्राप्त झाली आहे.

---

## ३. सहकाराची आवश्यकता

सहकार हा एक जीवनमार्ग आहे. त्याचा स्वीकार करणें किंवा न करणें हें ठरवावयाचे आहे. असें करतांना आपणांस हा मार्ग स्वीकारण्याची गरज काय ? त्यापासून फायदे कोणते याचा विचार व्हावयास पाहिजे.

आधुनिक युगांतील शास्त्रीय शोध, राजकीय तत्त्वें व भिन्न भिन्न मतप्रणाली यामुळें जीवनाविषयीं साकल्यानें विचार करितांना गोंधळाची परिस्थिति निर्माण होते. मनाची वाटचाल थबकते. 'हें' कीं 'तें' असा संभ्रम निर्माण होतों मार्ग अनेक आहेत. ते विशिष्ट विचार-सरणीस धरून असल्यामुळें फायद्याचे म्हणूनही प्रचार सुरू आहे. आपणांस जीवनसाध्य साधावयाचें असल्या-मुळें त्यांच्यापैकीं एक स्वीकारणें आहे. अशा वेळीं योग्य विचार व मार्गदर्शन झालें नाहीं तर या प्रवाही जीवनाच्या भवऱ्यांत सांपडून समाज संकटांत सांपडेल. आत्मोन्नतीचें ध्येय संपादन करण्याचें बाजूला राहील व

व संकटापासून सुटण्यासाठीं प्रयत्न करण्यांतच त्याचें बल खर्ची होईल.

हो परिस्थिति जागतिक स्वरूपाची असली तरी भारताला यांतून योग्य मार्ग काढणें अगत्याचे आहे चाळीस कोटी लोकसंख्येचा हा पुरातन व सहिष्णुता अंगी बाणलेला देश युगानुयुगें सुष्ट दुष्ट आघातांचे लक्ष्य बनला होता. हें आघात कधीं परकीय आक्रमकांकडून होत तर कधीं आपसांतील विजातिय वृत्तीमुळें घडून येत. अनेक धर्म, अनेक वर्ण, भिन्न भाषा, भिन्न दिक्षा, राहणीवर परिणाम करणारे भौगोलिक व हवामानांतील फरक, सागरासारख्या महान् नद्या व आकाशाशीं स्पर्धा करणारे प्रचंड डोंगर या व अनेक नैसर्गिक व अनैसर्गिक कारणांनीं आजपर्यंत या राष्ट्रांत एक-जीवीत्व पूर्णपणें कधींच होवूं शकलें नाहीं. जर कधीं काळीं तें इतिहासांत दिसून आल्याचें आढळले तर तें केवळ राजकर्त्यांच्या प्रभावी शक्तिमुळेंच.

परस्पर विरोधी व द्वद्वपूर्ण अशा या भारताच्या जनतेपुढें आत्मोन्नतीचा प्रश्न उभा आहे, व हें ध्येय साधावयाचा तिचा निश्चय आहे. जगांतील प्रवाह बघतां मुख्यत्त्वें करून ते दोन प्रकारांत मोडतात. पहिला प्रवाह जीवनांतील सर्व समस्या राज्यकर्त्यांवर सोपवून आपण ते सांगतील असें आचरण करावयाचे या वृत्तीचा. यांत आपणच आपल्या जीवनाचा भार सरकारवर टाकतो;

म्हणजेच जीवनाकरितां आपण मध्यवर्ती संस्थेवर अवलंबून असतो व स्वत: मात्र सर्व बाबतींत औदासिन्य पत्करतो. या विचारसरणींत कांहीं फायदे आहेत; नाहींत असें नाहीं. परन्तु तोटयाचा वाटा अधिक आहे. तो म्हणजे आर्थिक बाबीकरितां नागरिक स्वातंत्र्याचा होम करण्याची शक्यता या वृत्तीमुळें सत्तेचें केंद्रीकरण निर्माण होतें. त्यापासून अनेक दुष्परिणाम दिसून येतात व विशेष म्हणजे हुकूमशाही निर्माण होते. प्रत्येक बाबीकरतां सरकारवर अवलंबून राहणें योग्य नव्हे. शंभर वर्षांच्या अविश्रांत झगडयानंतर मिळालेलें स्वातंत्र्य व लोकशाहीला हुकूमशाहीच्या झोळींत टाकणे सुसंस्कृत मनाचें व स्वतंत्र वृत्तीचें लक्षण नव्हे समाजांतील जोम ज्यावेळीं खच्ची होतो व तो निष्क्रिय बनतो त्यावेळीं हुकूमशाहीला वाव असतो. भारता सारख्या विकसनशील व उत्साही देशांत हुकूमशाहीला मुळींच जागा नाहीं

दुसरें असें कीं राज्यकर्त्यांवर आपण सर्वस्वी अवलंबून राहिलों तरी आपली उन्नती आपल्या मनाप्रमाणें समाधानकारक होईलच ही खात्री देता येत नाहीं. सरकार राष्ट्राचा विचार विपत्कपणें करूंच शकणार नाहीं. अंतरराष्ट्रीयतेंतूनच तो होईल व त्यामुळें अनेकदां कुंचबणेचें प्रसंग समाजावर अनाहूतपणें येतील. सरकारांत सर्वसाधारणपणें भांडवलशाहीचें वर्चस्व आहे. परदेशांत साखरेला किंवा कापडाला चांगले भाव येतात म्हणून उद्योगपति व व्यापारी सरकारला परराष्ट्रीय चलनाचीं

गरज भागविण्यासाठीं निर्यातीची आवश्यकता मोठा गाजावाजा करून प्रतिपादन करतात. सरकारही देशांतील ग्राहकांना उत्पादन वाढीमुळें कमी किंमतींत हा माल मिळण्याची शक्यता विसरून निर्यातीचे परवाने देते. हा एकतर्फी निर्णय सरकार घेवूं शकतें याचें कारण आपण परक्या संस्थांवर या बाबतींत अवलंबून राहिलो म्हणूनच. आपणच आपले कपडे तयार करूं लागलो, साखर वा तसल्याच उपयुक्त वस्तूंची निर्मिती करूं शकलो, स्वतःचीं घरें स्वतःच बांधली व बाह्य जगावर कमींत कमी विसंबून राहिलो तर असला प्रसंग आपणावर कदापि येणार नाहीं. येथें स्वावलंबन साधावयाचे म्हणजेच सहकाराचा अवलंब करावयाचा.

तेव्हां सरकारवर सर्वस्वी अवलंबून वा विसंबून राहून आपली उन्नति आपणास करतां यावयाची नाहीं. उलट त्यामुळें आपलें व्यक्तिस्वातंत्र्यास व जीवन-स्वातंत्र्यास फार मोठें भय निर्माण होईल. हुकुमशाहींतील नागरिकांची स्थिती गुलामगिरीपेक्षां कांहीं वेगळी असते असें मानावयाचे कारण नाहीं. नोकरशाहींतही कमी जास्त प्रमाणांत तीच अवस्था. थोड्या लोकांच्या हातांत सत्तेचें किंवा संपत्तीचें केंद्रीकरण होणें हें बहुजन समाजाच्या दृष्टीनें कधींच हिताचें होणार नाहीं. सत्ता आणि संपत्ति ह्या दोन लालसा आहेत. लालसांची हांव अनावर असते. त्यांच्या मागें लागलेल्या व्यक्तींना व

समाजाला मानवी मूल्यांचा विसर पडतो. नीति अनीतीची चाड असत नाहीं. हातांत आलेली सत्ता व संपत्ति नेहमीं करितां कशी टिकविता येईल व तिच्यांत वाढ कशीं करतां येईल या सार्वभौमत्वाच्या कल्पनेसाठीं तो ईर्षेनें झगडतो. त्याच्या आड येईल त्याचा निकाल वाटेल त्या मार्गानें लावण्यास कचरत नाहीं.

अशा प्रकारें सुगम जीवन जगण्याकरितां हुकूमशाही व नोकरशाही मुळींच अनुकूल नाहीं. उलट त्यामुळें गुलामगिरी पत्करावी लागते हा ऐतिहासिक अनुभव असल्यामुळें आपणांस जीवनमार्गावर आत्मोन्नतिचें ध्येय गांठण्यास सहकार व लोकशाही ही दोनच महान् तत्त्वें उपयुक्त ठरतील हें निःसंशय. सहकारांत परस्पराविषयीं विश्वास व आदर बाळगणें आवश्यक असते. तसेंच एकत्रित येवून कार्य करावयाचे असल्यामुळे खऱ्या अर्थानें लोकशाहीला सहकाराचा पायाच म्हणणे रास्त. सारांश, आधुनिक प्रवाही जीवनास योग्य वळण देवून मानवी-मूल्यांची जोपासना करीत जीवन समृद्ध करण्यास सहकार हा एकमेव श्रेष्ठ उपाय आहे.

———

## ४. सहकारापासून फायदे

सहकार हें एकच तत्त्व असें आहे कीं ज्याच्यापासून फायदे अनेक आहेत व तोटे मुळींच नाहींत. सहकाराला मर्यादित स्वरूप देणाऱ्या अडचणी असतील कदाचित, पण त्या सहकाराला विरोधी म्हणून कधीच मांडता येणार नाहींत.

सहकाराचा मुख्य फायदा म्हणजे स्वावलंबन. समाजाच्या सर्व गरजा समाज स्वतः भागवील. त्याला इतरांच्या मर्जीची गरज नाहीं. समाजांतील प्रत्येक व्यक्ति आपल्या श्रमाचा व कौशल्याचा समाजाला पूर्ण फायदा देईल यामुळें समाजांत निःस्वार्थी पुढारी व आत्मविश्वासानें काम करणारे कार्यकर्ते निर्माण होतील.

हें स्वावलंबन स्वीकारल्यामुळें संपत्ति व सत्ता यांच्या केंद्रीकरणापासून समाजाला भय बाळगण्याचें कारण उरणार नाहीं. सहाजिकच मानवी मूल्यें उचलून धरलीं

जातील, त्यांची जोपासना होईल. संपत्तीवर निर्भर असलेल्या संस्कृतीपेक्षां मानवी मूल्यावर आधारलेली संस्कृति श्रेष्ठ व टिकावू असते याची खात्री पटवून देण्यास सहकारी समाजाचा फारच उपयोग होईल.

सहकारी समाजांत दृष्टी नफ्यावर केंद्रित न होतां ती कल्याणकारी वृत्तीची जोपासना करते. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं आर्थिक दृष्टचा सहकारी संस्था आंतबट्टयाचा व्यवहार करतील किंवा सहकाराला किफायतशीर धंद्याचे वावडे आहे. धंदा तर किफायतशीर चालवावयाचाच पण त्याचें ध्येय नफा नसून ग्राहकांना जास्तींत जास्त समाधान मिळवून देण्याचा प्रयत्न करीत राहणें हें राहील. असें करतांना मालाचा दर्जा नेहमींच उच्च राहील, भेसळीचे अथवा नफेबाजीसाठीं अनुसरण्याच्या निंद्य प्रकारांचें उच्चाटण होईल. मध्यस्थांची उचलबांगडी झाल्यामुळें किंमती उतरतील. साठेबाजी करून ग्राहकांची कुचंबणा करणें किंवा त्यांचेकडून जास्त भाव वसूल करणें या भांडवलशाही वृत्तीस आळा बसून ग्राहकांना ठराविक भावांत माल मिळण्याची शाश्वति निर्माण होईल. त्याबरोबरच एकदम जास्त माल घेण्यांत पैसे गुंतवून होणारा कोंडमारा, सहकारी व्यवहारांत होणार नाहीं.

खोटया जाहिराती, खोटी वजनें, मापें किंवा खोटे हिशेब ठेवण्याचे सहकाराला कारण नाहीं. जास्त नफा

मिळवून तो कमी दाखविण्याकरितां व सरकारी कर चुकविण्याकरितां भांडवलशाही वृत्तीचें दुकानदार या साऱ्या अनिष्ट प्रकारांचें अवलंबन करतात. परंतु सहकारांत नफ्यापेक्षां समाजाला जास्त समाधान देण्याची चाड असल्यामुळें त्याला या विघातक भानगडीची आवश्यकता नाहीं. त्यामुळें सहकाराचे सर्वच व्यवहार व हिशेबसुद्धां प्रामाणिकपणावर आधारलेलें आढळतात.

सहकारी क्षेत्रांत व्यवहार रोखीचे असल्यामुळें दुकानाला बुडित कर्जापासून धोका नसतो. सभासद जितक्या प्रमाणांत जास्त खरेदी करील तितक्या प्रमाणांत त्याला कमिशन मिळणार असल्यामुळें खरेदीपासून मिळणाऱ्या नित्य समाधानापेक्षां अधिक समाधानाचा वाटा त्याच्या पदरांत पडतो. तसेंच रोखीच्या व्यवहारामुळें हातांत पैसा असेल तरच व तेवढीच खरेदी करणें शक्य होते. यामुळें काटकसरीचें धोरण अनायासेंच अनुसरलें जाते. उधारींत गरजेप्रमाणें खरेदी व गरजेला कधींच अंत नसतो ही परिस्थिती. परन्तु रोखीच्या व्यवहारांत गरजेची सांगड हातीं असलेल्या पैशाशीं घातल्यामुळें भरमसाट खर्चाला आळा बसतो व काटकसरीनें संसार करण्याची उमदी प्रवृत्ति निर्माण होते.

सहकारी क्षेत्रांत गरजेप्रमाणें मालाचें वाटप होत असल्यामुळें निर्मिती, वाटप व ग्राहक या बाबींतील अडचणींचा सहज निरास होतो. पुरवठ्याची शाश्वति

दा. क्र. 90232

ग्राहकांना व मागणीची शाश्वती निर्मात्यांना असल्यामुळें मागणी व पुरवठा यांचा सुंदर मिलाप तयार होतो, व राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय होत नाहीं. तसेंच उत्पादनाचा अंदाज अचूक झाल्यामुळें निर्मिती व वाटपाचे धोरण आगाव् ठरवितां येते. यामुळें कारखाने बंद करणें व मजूरांना बेकारींत पाडणे असले दुर्धर प्रसंग समाजांत निर्माण होत नाहींत. याचा परिपोष म्हणून कारखानदार व मजूर यांचे संबंध स्नेहाचे, सलोख्याचे व खेळीमेळीचे असतात. तसेंच सहकारांत सट्टेबाजीला वाव नसल्यामुळें त्यापासून निर्माण होणारे अस्थिर आर्थिक जीवन आपोआपच नाहीसें होतें सहाजिकच बेकारीला आळा बसतो.

सहकारी समाजामुळें उत्तम व कार्यकुशल नागरिक तयार होतात व त्यामुळें राष्ट्रीय लोकशाहीला जागरूकतेनें आपले व्यवहार करावे लागतात. असें न झाल्यास राज्यारूढ पक्षाची खांदेपालट करावयास हे नागरिक भाग पाडतील. हा एक महान् राजकीय फायदा सहकाराच्या अवलंबापासून समाजाला मिळतो. परंतु याहिपेक्षां महत्वाचा व चिरकाल टिकणारा असा एक फायदा पदरांत पडण्याची शक्यता नुकतीच निर्माण झाली आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधींनी शासन विरहित समाजाचें विशाल चित्र आपणापुढें ठेवलें व त्याला पूरक अशी सर्वोदयाची विचारसरणी प्रसृत केली. परंतु

भारताच्या दुर्दैवानें या महान् मानवतावादी नेत्याची सेवा व मार्गदर्शन या कार्यास अगदीं अल्पकालच मिळालें. त्यांचे थोर शिष्य आचार्य विनोबांनीं आपल्या अचूक निदान पद्धतीने त्याच ध्येयाकरितां ग्रामदानाची मोहीम सुरूं केली. या चळवळीनुसार प्रत्येक गांव हा एक स्वतंत्र राज्यघटक बनूं शकेल. ग्रामांतील जमीन व उत्पादन-सामुग्री सामुदायिक मालकीची असल्यामुळें व उत्पन्नाचें वांटप प्रत्येकाच्या गरजेप्रमाणें होणार असल्यामुळें ग्रामराज्यांत शासनाला विशेष क्षेत्र राहणार नाहीं. गांवांतील आबालवृद्ध ग्रामोद्धाराच्या ह्या ना त्या कामांत गुंतल्यामुळें गुन्हेगार बनण्याला कोणालाहि अवसर मिळणार नाहीं. समाजाविरुद्ध गुन्हा करण्याचें धाडसही कोणाला करवणार नाहीं. अशा प्रकारचें समाज जीवनाचें चित्र रेखाटलें जात आहे. या चित्रांत जर सहकारी तत्वांचा रंग भरला तर हें चित्र किती सत्यनिष्ठ व उठावदार दिसेल याचा विचार करणें आनंददायी ठरेल. तेव्हां ग्रामदानाची जीवनपद्धती सहकारी तत्वावर आधारण्यांत आली तर त्यापासून किती भरीव व दूरगामी स्वरूपाचें आदर्श कार्य होईल बरें !

———

## ५. सहकाराची जोपासना

कांचेच्या वस्तूची जोपासना व वापर करणे असल्यास कांचेच्या ठिसूळतेचा अभ्यास करून स्वच्छ करतांना रेघोटचा पडणार नाहींत याची दक्षता घ्यावी लागते. नायलानची साडी सांभाळावयास सांगितले तर तिला धुतांना व वापरतांना कसली काळजी घ्यावी लागेल याची जाणीव हवी नाहींतर गरम इस्त्री तिच्यावर फिरविल्याबरोबर ती इस्त्रीला चिकटेल व निरूपयोगी होईल. तसेंच सहकाराची उपयुक्तता पटल्यानंतर त्याची जोपासना केलीच पाहिजे हें मनाशीं ठरवितांना सहजच प्रश्न उद्‌भवतो सहकाराची जोपासना करावयाची म्हणजे काय करावयाचें ?

प्रत्येक वस्तू, सेवा अथवा शक्तीची धारणा या कांहीं अंत:प्रवाहावर अवलंबून असते. याच अंत:प्रवाहाला समजुतीसाठीं तत्वें म्हणूं या. जोपर्यंत हे अंत:प्रवाह

सांभाळले जातात तोपर्यंत ती वस्तू, सेवा अथवा शक्ति कार्यक्षम असते. अंत:प्रवाहांत बिघाड झाल्यास त्यांची कार्यक्षमता कमी होते; नाहींशी होते. या सर्वसाधारण नियमाला धरून सहकाराची छाननी केली तर त्यांत ठोकळ मानानें खालील तत्वें वा अंत:प्रवाह दिसतील.

सहकार विश्वव्यापी आहे. जगांतील कोणत्याहि देशांत परिणत स्वरूपांतील सहकारी संस्था भरीव स्वरूपाचे कार्य करीत असल्याच्या दिसतील. इंग्लंड सारख्या औद्योगिक देशांत, फ्रान्स सारख्या विलासी देशांत, स्वीडन सारख्या पहाडी देशांत वा जर्मनी सारख्या शास्त्रप्रगत कष्टाळू देशांत 'सहकार' लोकजीवनांत महत्वाचें स्थान पावल्याचे दिसून येईल. स्वित्झर्लंडसारख्या चिमुकल्या देशांतही सहकाराचें कार्य वाखाणणीय आहे. याचे मुख्य कारण असें कीं सहकार ही शांततामय सहजीवनाची भावना आहे. जेथें जेथें शांतताप्रिय, भावनाशील मानव आहेत तेथें तेथें सहकार असणारच. सहकार जाति, वंश, लिंग अथवा वर्ण यावर आधारलेला भेद मानीत नाही. कार्याला अनुकूल क्षेत्र दिसतांच सहकार प्रकट होतो; त्याचा आविष्कार होतो.

लोकशाही सरकारला पायाभूत आहे. सहकार ही लोकांची चळवळ, लोकांनींच सुरू केलेली, तिचें ध्येय लोक कल्याणाचें व या ध्येय प्राप्तिसाठीं केलेले प्रयत्नही लोकांकडूनच. यामुळें खऱ्या अर्थानें संपूर्ण लोकशाहीच्या

आराखडयांत ती सामावते. दुसरें असें कीं सहकारी समाजाला किंवा संस्थेला आवश्यक असलेल्या शासनाची व्यवस्था लोकशाही रीतीचीच असते. कारभार लोक-प्रतिनिधी चालवितात. कितीही भांडवली विभाग घेतले तरी प्रत्येक सभासदाला एकेकच मत असते. यामुळें खरोखरीनें हा कारभार लोकाभिमुख असतो. हे प्रतिनिधि सहकारी संस्थाच्या कारभारावर सर्व साधारणपणें देखरेख करतात; दैनंदिन व्यवहार कामाकरितां अधिकारी नेमतात, निरनिराळया योजना आंखतात व सभासदापुढें मांडतात.

या पद्धतीमुळें सत्तेचे केंद्रीकरण होत नाहीं. ठरलेल्या कालखंडांत निवडणुका होवून अधिकार बदलाची शक्यता असल्यामुळें एकदां अधिकारपद गांठले कीं बघावयास नको या विचारसरणीला वाव मिळत नाहीं.

कारभाराची दक्षता देखील उच्च कोटीची रहावयास मदत होते. सभासद सर्वसाधारण जन-समुदायांतील असल्यामुळें ते आपल्या हिताविषयीं जागरूक असतात. त्यामुळें जर कचेरी कामांतील शिथिलता त्यांच्या हिताच्या आड आली तर ते विशिष्ट अधिकाऱ्यांना जाब विचारल्याशिवाय राहणार नाहींत. तसेंच कमितकमी किंमतींत ग्राहकांना वस्तूचे वांटप करावयाचे असल्यामुळें किंवा स्वस्त किंमतीत निर्मिती करावयाची असल्यामुळें सत्ताधिकाऱ्यांच्या मागें दक्षतेबद्दल सारखी टोंचणी लागणे

साहाजिकच आहे. याचा अर्थ जर कोणी असा करील कीं सहकारी क्षेत्रांत पगारमान कमी श्रेणीचे असावें तर तो मात्र चुकीचा ठरेल. तें इतर धंद्याच्या तुलनेनें बरोबरीचा असतें. उदाहरणार्थ, लंडन को-ऑपरेटिव्हच्या मुख्य अकौन्टंटला दरमहा अदमासे तीन हजार रुपयांपेक्षां जास्त पगार आहे.

सभासदांना सर्व साधारणपणें हिशेबांचीं पुस्तकें पाहण्याची मुभा असते. त्यामुळें हिशेबांत घोटाळे झाले असतील किंवा घुसडले गेले असतील तर ते कोणाच्या ना कोणाच्या तरी लक्षांत आल्याशिवाय राहूं शकणार नाहीं. शिवाय हिशेब म्हणजे झालेल्या किंवा होवूं घातलेल्या व्यवहाराचे नाण्यांतील स्वरूप असल्यामुळें झालेल्या व्यवहारांतील घोटाळेही त्यामुळें नजरेआड होणार नाहींत. या भीतीनें कारभाराच्या व्यवस्थेंत चोखपणा व दक्षता वाढेल.

स्वावलंबन हा सहकाराचा आत्मा आहे. निर्बल जनतेची भांडवलशाही वृत्तीनें लुटालूट व पिळवणूक केल्यामुळें निर्माण झालेली सहकार ही आर्थिक रचना असल्यामुळें तिला भांडवलशाहीच्या राक्षसी स्वरूपाशीं व लालसेशीं तोंड द्यावे लागणार आहे. तेव्हां सहकाराला अगदीं पूर्णपणें स्वावलंबनाचे ध्येय गांठावे लागणार हें ठरलेंलेच. जेव्हां केव्हां यांत कमतरता आढळेल तेव्हां अचुकपणें भांडवलशाही प्रहार करावयास चुकावयाची

नाहीं. जर सहकार केवळ वाटपांत गुंतला असेल तर भांडवलशाही निर्मितिच्या क्षेत्रांतून त्याची गळचेपी करील. तेव्हां सहकाराला जेवढे स्वावलंबन स्वीकारता येईल तेवढे फायद्याचे.

तसेंच सरकारावरही सहकारानें विशेष अवलंबून राहणे धोक्याचे आहे, कारण सरकार म्हणजे या ना त्या पक्षाचे प्रतिनिधी. जर त्यांना सहकाराची विशेष आस्था वाटत नसेल किंवा ते सहकार विरोधी प्रवाहाचे साथीदार असतील तर सरकारी नियंत्रणेंतून सहकारावर अंकुश निर्माण करतील. तरी सहकारानें स्वावलंबनाचा स्वीकार शक्य त्या मर्यादेपर्यंत करणेंच इष्ट.

सहकारी समाजांत एकीचें महत्त्व फार आहे. जरी प्रत्येक सभासदाला सभासद होण्याची किंवा सोडण्याची मुभा वा स्वातंत्र्य असलें तरी जोपर्यंत तो सभासद आहे तों पर्यंत त्यानें स्वतःची व इतर सभासदांचीं जबाबदारी स्वीकारणे अपरिहार्य. तें त्याच्या सभासदत्वांतच अंतर्भूत आहे. म्हणूनच 'All for one and one for all' हें तत्व सहकारांत महत्वाचे मानले जाते. असें असल्याशिवाय बलवान भांडवलशाहीस तोंड देणें जड जाईल. सामुदायिक उन्नतीसाठीं ज्याअर्थी आपण एकत्र येतो त्या अर्थी सामुदायिक जबाबदारी स्वीकारणे सहजच आपल्या वाटयांस येतें. वस्त्रांतील एखादा धागा जर कमी ताकदीचा असेल तर वस्त्राच्या टिकावूंपणासाठीं

इतर घाग्यांनीं जरासा जास्त बोजा उचलणे योग्य नाहीं कां होणार! बंधूभाव व ऐक्य यांचा याहून दुसरा असा काय अर्थ असणे संभवनीय आहे! जेव्हां प्राप्त कठीण परिस्थितींतून डोकें वर काढावयाचे असते तेव्हां ऐक्य व बंधूभावाच्या तळमळींतूनच ध्येय गांठता येईल. याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. तसेंच सहकाराच्या कोणत्याहि अवस्थेंत सभासदांनीं समतेचे तत्व अंगिकारलें पाहिजे व अनुसरले पाहिजे. सहकारांत सारे सारख्याच मोलाचे व तोलाचे, त्यांत उच्च नीच नाहींत. ही भावना सदोदित जीवंत ठेवून वागणूक झाली पाहिजे. म्हणजे ऐक्याच्या व बंधुत्वाच्या तत्वाला कधींहि बाध येणार नाहीं. जीवंत एकजुटीसाठीं समतेनें वागविण्याची आवश्यकता आहे. असा एकहि प्रसंग निर्माण होवूं देवूं नये कीं ज्यामुळें सहकाराला विरोध करणाऱ्या शक्तींना सहकारी सभासदांत फूट पाडण्याची सधी मिळेल. यांतच सहकाराचें यश व विरोधाची पिछेहाट आहे. असें असल्यामुळें सहकारांत विवाद्य विषयांचा अंतर्भाव न करणे किंवा त्यांना टाळणें आवश्यक आहे. भांडवलशाहीच्या अथवा सत्ताधिकाऱ्यांच्या जुलुमांतून या चळवळीचा जन्म असल्यामुळें अन्याय व जुलुमाला या चळवळींत मुळींच स्थान नाहीं. उलट न्याय व समता हें या चळवळीला आधारभूत आहेत.

सहकार नफेबाजीच्या विरुद्ध आहे. सहकाराचे ध्येय कल्याणकारक किंवा समाधानवर्धक आहे. मानवी मूल्याची सहकाराला आस्था आहे. सहकार ही एक

आर्थिक रचना असल्यामुळें प्रथम पासूनच निर्मितीची किंमत कमी करावयाची व ग्राहकांना कमितकमी मोबदल्यांत वस्तू मिळाव्यात असा सहकाराचा विशेष आग्रह आहे. त्यामुळें अनायासेंच सभासदांना काटकसर व बचतीचें आर्थिक तत्व आचरणांत आणावयास मदत होते.

सहकारांत नफेबाजीवर भर नसला तरी धंद्यांत खोट येणें मान्य नाही. त्यामुळें धंदा किफायतशीरच करावा लागतो, त्यापासून होणारा फायदा साराच्या साराच सभासदांना वांटून देतां येत नाहीं. त्यांतील कांहीं भाग सभासदांना वांटून, उरलेल्या भागाचा घसारा, आकस्मित खर्चाच्या बाबींकरितां काढून, उरलेला सर्व एकतर त्याच चळवळींत पेरला जातो किंवा शिक्षणादि समाज कल्याणाच्या कार्याकरितां वापरला जातो. यावरून सेवाभावाची जाणीव सहकारांत अंतर्भूत आहे हें निश्चित.

सहकारी कारभार पद्धतीची कांहीं वैशिष्टें अशीं आहेत. गैरहजेरींत मत नोंदणी केली जात नाहीं. सभासदाला मतदान करतेवेळीं हजर रहावयास पाहिजे. सभासदांना व्यवस्थापकांपासून नियमित अहवालाची अपेक्षा असल्यामुळें अहवालांचा तुलनात्मक अभ्यास होतो व एखाद्या बाबतींत कारभाराची दिशा चुकत असेल तर वेळींच तीं सुधारण्यास मदत होवून परिणामी होणारे नुकसान टळूं शकते.

सहकारी सभासदांना धंदे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत येते. युरोपीय देशांतील या बाबतींतील प्रगति वाखाणणीय आहे. परस्पर देशांतील सभासदांना शिक्षणासाठीं परस्परांच्या देशांत पाठवून सहकारी आचारांतले चांगल्या गोष्टीचें लोण देशादेशांत पोंचविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. यामुळें आंतरराष्ट्रीय सहकाराला हातभार लावण्यास मदत झाली आहे.

वर सांगितलेलीं सहकारी तत्वें अनुभवसिद्ध आहेत. शतकाचा अनुभव सहकारी चळवळीच्या पाठीशी असल्यामुळें कोणकोणत्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करावयास पाहिजे म्हणजे खांचखळगे व अडचणी टाळतां येतील यांचा विचार करतांना ती ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रामुख्यानें उमटतात. ती सहकाराच्या आचारांत सांपडतात व सातत्याच्या निकषाशीं त्यांचा संबंध आहे. सहकाराची जोपासना करावयास ती उपयुक्त ठरतील.

———

## ६. सहकारी शिक्षण

सहकाराची कल्पना जरी पुरातन असली आणि सामान्य जीवनांत त्याचा वापर युगानुयुगें होत असला तरी पण सहकारी आर्थिक रचना भारताला किंबहुना जगाला नवीनच आहे. तिचा पुरस्कार पाश्चिमात्य जगांत प्रथम झाला व ब्रिटिश आमदानींत तिचा भारतांत प्रवेश झाल्यामुळें सहकारासंबंधीचें सर्व वाङमय इंग्रजींतच झाले. त्यामुळें सहकाराचे आकलन बहुजन समाजाला यथार्थानें झाले नाहीं. म्हणूनच अत्यंत उपयुक्त असून देखील सहकारी आर्थिक रचनेचा पाया भारतांत चांगला रुजला नाहीं. या परिस्थितींत बदल होणे जरूरीचें आहे. असें होण्याकरितां सहकाराचें सर्वांगीण ज्ञान समाजाच्या सर्व थरापर्यंत पोंचेल अशा रीतीनें सहकारी शिक्षणाची उभारणी केली पाहिजे. भांडवलशाही नफेबाजीवर आधारली असून तीपासून समाजाला सोसावे लागणारे अनिष्ट परिणाम, ग्राहकांची होणारी आर्थिक व सामाजिक

कुचंबणा, नफेबाज निर्मात्याकडून होणारी ग्राहकांची व मजुरांची पिळवणूक, निर्मितीची सारी साधनें सरकारच्या हातीं गेल्यास हुकुमशाही राजवटीची संभाव्यता व त्यामुळें आर्थिक स्वास्थ्याच्या भावी स्थैर्यासाठीं नागरिक स्वातंत्र्याचा द्यावा लागणारा बळी, सहकारी तत्त्वें आणि तंत्रें यांची सांगोपांग माहिती, स्वावलंबनाचे महत्व व त्यापासून होत असलेली मानवी मूल्यांची जोपासना, इत्यादिकांचे ज्ञान स्वातंत्र्य अबाधित राहून आर्थिक उन्नतीला उपकारक असल्याची जाणीव उत्पन्न करून देणारे शिक्षण, बहुजन समाजाला मिळाले पाहिजे. त्या बरोबरच सहकारांत लोकशाहीच्या होणाऱ्या विकासाचेंहि महत्व पटवून दिले पाहिजे. असें झाले म्हणजे सहकाराकरितां नसेल कदाचित पण स्वतःच्या कल्याणाकरितां तरी भारतीय नागरिक सहकाराच्या तंत्रांशीं व तत्वांशीं इमानानें वागतील.

हें शिक्षण देण्याचें निश्चित प्रयत्न करावे लागतील. ते अनेकविध असूं शकतील. सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेंत निर्माण केलेलें वाङ्मय सहजगत्या नागरिकांच्या हातीं पडेल अशा तऱ्हेनें त्याचे वांटप करून, यात्रा, बाजार, मेळे अथवा इतर जमावांच्या ठिकाणीं फिरत्या मोटारीं किंवा प्रवासी प्रचारकांकडून सहकाराचा आंखीव प्रचार करून, शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत सहकार हा विषय सक्तीचा करून, अभ्यास मंडळें, वाद-



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 24583 वि: मिकां६
क्रमांक 2223 नों: दि: 24/3/60

विवाद मंडळें, सभा-सम्मेलनांतून सहकाराचा उहापोह करून, प्रदर्शनांच्या स्वरुपांत, नाटक तमाशांतून किंवा रेडिओ-सिनेमाद्वारें हें शिक्षण पद्धतशीरपणें व योजना आंखून, परिणामाचा आढावा घेत द्यावयास पाहिजे.

याहिपेक्षां जास्त परिणामकारक तऱ्हा म्हणजे ज्या ज्या कार्यक्षेत्रांत सहकारी चळवळ यशस्वी झाली आहे त्या त्या क्षेत्रांस भेटी देवून, त्यांच्या कार्यपद्धतीचा, संचालन कौशल्याचा व सहकाराला मिळालेल्या वळणांचा अभ्यास करून, तसेंच ठराविक नमुन्याच्या सहकारी संस्था स्थापून व त्या यशस्वी करून दाखविण्यानें जास्त टिकावू परिणाम होतील. यशाची हमी यशच देवू शकते.

अशा प्रकारें सर्व साधारण जनतेंत सहकाराची आस्था उत्पन्न होवून सहकारी बाणा तयार होईल. परंतु एवढयानेंच काम भागणार नाहीं. सैन्याला जसें इमानी व बलवान सैनिक आवश्यक तितकेंच किंबहुना त्याहून कांकणभर अधिक गरज कुशल सेनानींची असते. सेनानी आपल्या अंगच्या चातुर्यानें कमीतकमी सामुग्रींत जास्तीतजास्त कार्यक्षमतेनें जबाबदारी पार पाडतो. सहकारालाही कुशल अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. त्याकरितां बलवान शत्रूच्या नानाविध युक्त्या, प्रयुक्त्या, कारवायांच्या मागील डाव ओळखून सहकारी व्यवहार पद्धतीची रचना यशस्वी

रीतीनें पार पाडणे हें काम करण्याकरितां सहकारी तत्वावर श्रद्धा असलेलें कुशल मॅनेजर, चिटणीस, संचालक, व्यवस्थापक वगैरेसारख्या अनेक अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे, या सर्वांच्या शिक्षणाची सहकारी दृष्टीकोनांतून व्यवस्था व्हावयास पाहिजे. सहकारी चळवळीने सरकारी खात्यांशी संगनमत करूनच अशा शिक्षणाची व्यवस्था करणे शहाणपणाचें ठरेल. असें करीत असतां व्यवस्थापन-शास्त्र व आर्थिक बाबींच्या शिक्षणाला विशेष महत्व दिले गेल्यास सहकारी आर्थिक रचना अधिक बळकट व कार्यक्षम होईल.

या शिक्षणांतून इमानी, निष्ठावंत व सहकारावर पूर्ण विश्वास असलेले व आपल्या आर्थिक उन्नतिकरतां सहकाराचाच जास्तींत जास्त उपयोग आस्थेवाईकपणें करणारे सभासद निर्माण होतील. त्याबरोबरच सहकारी यशाचे आंकडे बोलके होतील.

आर्थिक क्षेत्रांत चढ उतार असावयाचेच. फायद्याचे वेळीं सहकाराला साथ व नुकसानीचेवेळीं बाजूला सरणारी मंडळी सहकाराला धोका उत्पन्न करतील. प्रसंगाचे वेळीं एकजूट कायम राहिली तर टिकाव लागतो. नाहीतर प्रवाहाच्या भोंवऱ्यांत गटांगळ्या खाव्या लागून प्राणावरहि बेतते. मनाची पकड घेवून निश्चयाचा ठामपणा व सहकारावर न ढळणारा विश्वास निर्माण करील अशा प्रकारचा शिक्षणक्रम आंखणे आवश्यक आहे.

सहकारी शिक्षणाचे ध्येयासंबंधीं दुमत होणे अशक्य असले तरी शिक्षणांत कोणत्या विषयांवर किती प्रमाणांत भर द्यावयाचा या विषयीं एकवाक्यता होईलच असें निश्चयानें सांगता येणार नाहीं. मुंबई प्रांतांत सहकारी उच्च शिक्षणाकरितां एक अभ्यासक्रम आंखला गेला आहे. या अभ्यासक्रमासाठीं निवडक सहकारी अधिकाऱ्यांची निवड केली जाते. अभ्यासक्रमांत सहकारी कायदा, सहकारी बँकिंग व पतपेढ्या, सहकारी कारभार पद्धति (Co-operative Organisation) हे तीन विषय सक्तीचे म्हणून ठेवले गेले आहेत. इतर चार ऐच्छिक विषयांपैकीं कोणताही एक निवडावयाचा आहे. त्यांत वरील विषयांपैकींच दोन असून सहकारी मार्केटिंग व सहकारी ग्रामोद्योग, लहान कारखाने व सहकारी उद्योग असें उरलेले दोन आहेत. त्यांत एक मोठी उणीव दिसते. ही उणीव म्हणजे कारभार विषयक ज्ञानाची. त्या विषयाचा अभ्यासक्रमांत अंतर्भाव केलेला दिसून येत नाहीं. भांडवलशाही पद्धतींत अथवा सहकारी पद्धतींत उत्कृष्ट व दक्ष कारभार असणें आवश्यक व अगत्याचे आहे. विशेषत: सहकाराला हे अत्यावश्यक आहे. कारण त्याला बलशाली स्पर्धेला तोंड द्यावयाचे आहे व दुर्बलांना सबलतेप्रत न्यावयाचे आहे. त्या दृष्टीनें व्यवस्थापनशास्त्र व कला (Principle & Practice of Management) या विषयाचा अंतर्भाव सक्तीच्या विषयांत होणे हिताचे अशी सूचना करावीशी वाटते.

भारतांत सध्या योजनापर्व सुरूं आहे. पहिली योजना संपली; दुसरी सुरूं आहे व अशा अनेक योजना पाठोपाठ येणारच. नियोजन मंडळानें भारतांतील नागरिकांकरितां आठ तास काम पुरेल अशा तऱ्हेनें योजना आखल्या आहेत. त्यानुसार घडल्यास नागरिकांना आठ तास काम व त्या कामाच्या मोबदल्यांत योग्य वेतन मिळण्याची व्यवस्था होईल. परन्तु दिवसाची आंखणी चोवीस तासांत केली गेली असल्यामुळें उरलेल्या सोळा तासाचे जीवन मोकाट अथवा योजना रहित राहील. परन्तु असें करून चालणार नाहीं. आठ तास काम, सात तास झोंप इतर दोन तास दैनिक कृत्यें यांत खर्ची पडले तरी सात तास शिल्लक उरतात. या सात तासापैकीं दोन तास विश्रांतीचे वजा करून उरलेल्या पांच तासांत जर कामगारांचे मन चांगल्या कार्यांत गुंतविले नाहीं, त्याच्या जीवनांत नवीन आशा, नवीन प्रवाह निर्माण केले नाहींत तर निरोद्योगी मन राक्षसी विचारांना थारा देईल व त्याचा समाजावर अनिष्ट परिणाम घडेल. या उरलेल्या पांच तासासंबंधींच्या योजना सहकारी पद्धतीनें आंखल्या गेल्यास नागरिकांमध्यें परस्परासंबंधीं आदरभाव व विश्वास निर्माण होण्यास मदत होईल व निर्भयतेचे स्थिर जीवन समाजास प्राप्त होईल. रिकामपणाचे वेळीं करमणूकीची तरतूद. शिक्षण, समाजकार्य अथवा असल्याच उपयुक्त व्यवस्थेची आंखणी झाल्यास इतरांच्या जीवनांत ढवळाढवळ करावयाची संधि व फुरसत मिळणार

नाहीं. अनेक जीवन समृद्ध करणाऱ्या गोष्टी कामगारां-पुढें मांडून त्यांचा कल आशादायक व जीवनोपयोगी वृत्तींकडे वळविता येईल. यामुळें भविष्यकालीन विकासाचे बीज पेरले जाईल व रिकाम टेकडेपणामुळें वाढणाऱ्या विघातक प्रवृत्तींना आळा बसेल.

---

## ७. सहकार आणि सरकार

सहकार ही लोकांची चळवळ आहे. दुर्बलांनीं स्वतःच्या उन्नतीकरितां करावयाचे हें कार्य असल्यामुळें या कार्याची सुरुवात लोकांतूनच व सहजस्फूर्त व्हावयास पाहिजे. इतर देशांत ती त्याच स्वरूपांत दिसते. भारतांत मात्र या उलट प्रकार दिसतो. भारतांत ही चळवळ सुमारें चौपन्न वर्षांपूर्वी सरकारनें सुरू केली व अजूनही या चळवळींत सरकारचा हात प्रामुख्यानें दिसतो. स्वावलंबनाच्या या चळवळींत अडीअडचणीच्या वेळी सरकारी मदत या ना त्या नात्यानें मिळून अडचणींतून मुक्तता होण्यास अनुकूल वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे. त्या व्यतिरिक्त सरकारची या क्षेत्रांतील कामगिरी म्हणजे जनतेच्या उपक्रमशीलतेला आळाच मानावयास पाहिजे. परंतु भारतांत असें दिसून येते कीं ही चळवळ प्रथमपासूनच सरकारच्या आश्रयाखालीं वाढल्यामुळें सरकारी नियंत्रण व देखरेख तिला साह्यभूत झाले आहे. हा भाग

सोडून दिला तर सहकाराकरितां सरकारनें केलेले प्रयत्न स्तुत्य आहेत.

मध्यवर्ती सरकारने सहकार खातें उघडले असून त्या करितां मंत्र्यांची नेमणूकही केलेली आहे. तसेंच प्रत्येक राज्याचे. सहकारी चळवळीला मार्गदर्शनार्थ या खात्याचा उपयोग व्हावा अशी घटनेची अपेक्षा आहे. ती पुरी होणें सहाजिकच जनतेच्या इच्छेवर व खात्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहील.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपल्या शेतकी विभागांत सहकाराचा पोट विभाग निर्माण केला आहे. सहकारी चळवळी बाबतची आंकडेवारी व इतर महत्वाची माहिती हा विभाग संकलित रूपानें वार्षिक अहवालांत प्रसिद्ध करतों. तसेंच सहकारी योजनांच्या स्वरुपाची रेखाटणी व तपशीलाबद्दल आंखणीच्या बाबतही हा विभाग सरकारी खात्यांना उपयोगी पडतो. सहकारी शिक्षणाचे प्रयोग कांहीं प्रांतांत सुरू झाले आहेत. त्या बाबतींतही सहकारी क्षेत्रांतील तज्ञ व सरकार यांचे सहकार्य मिळवून उपयुक्त असें कार्य या विभागाकडून होत आहे.

सहकारी संशोधनाकरितां सरकारनें मंजूर केलेली रकम गोखले स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स अॅण्ड पॉलिटिक्स, बाँबे प्रदेश सहकारी इन्स्टिटयूट व इंडियन सोसायटी ऑफ अॅग्रिकल्चरल एकॉनॉमिक्स सारख्या संस्थांना सहकारी

क्षेत्रांत संशोधनासाठीं दिली आहे. या बाबतींत गोखले स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स या प्रसिद्ध संस्थेकडून शैक्षणिक व मार्गदर्शनात्मक म्हणून चांगली कामगिरी होत असल्याचें ऐकिवांत आहे. परन्तु उर्वरित दोन संस्थांच्या कामगिरीचा विशेष उल्लेख कोठेंच आढळत नाहीं.

सहकाराचा प्रचार जनतेंत व्हावा व जनता सहकाराभिमुख व्हावी म्हणून मद्रास, मुंबई आदि सहकारी इन्स्टिटयूटनें मासिकें, पुस्तकें वगैरेची प्रसिद्धि करून लोक जागृतिचे प्रयत्न चालू केले आहेत. सभा, व्याख्याने, तसेंच शेतकी व गुरांची प्रदर्शनें यांत व जत्रांमध्यें सहकारी तत्वांचा प्रचार केला जातो. या कामी सरकारी नियंत्रणेचा वांटाही भरपूर आहे.

सरकारकडून किंवा सहकारी वृत्तीच्या कार्यकर्त्यांकडून कांहीं योजना आल्या तर त्या नीटपणें अभ्यासून व त्यांना आर्थिक, व्यवहारिक व सहकारी निकष लावून त्यांच्यावर योग्यायोग्यतेचा शिक्कामोर्तब करण्याकरितां सरकारने स्टेट को-ऑपरेटिव्ह कौन्सिलची योजना केली आहे.

मद्रास प्रांतांत दारुबंदीचा प्रयोग सुरूं केल्यामुळे बेकार झालेल्यांना ताडीचा गूळ काढण्याचे छोटे छोटे पंधराशें छत्तीस कारखाने सहकारी तत्वांवर काढण्यास

सरकारने मदत दिली. १९५४ सालीं या संस्थांचे सभासद एक लक्ष सत्यांशी हजार होते. या संस्थांनीं एकूण तीस लक्ष एकसष्ट हजार मण गूळ विकला व त्याची किंमत एक कोटी सदोतीस लक्ष सात हजार रुपये आली.

या पुनर्वसनाचे कामीं सरकारची मदत वाखाणणीय होती. या संस्थांवर देखरेख करण्याकरितां सत्यांशी अधिकारी नेमलेलें होते. गूळ तयार करण्याच्या पद्धतीचें शिक्षणही मोफत देण्याची व्यवस्था सरकारनेंच केली. इतकेंच नव्हे तर या सर्व सहकारी संस्थांना गूळ तयार करावयास लागणारी यंत्र सामुग्री निम्म्या किंवा त्याहूनही कमी किंमतींत पुरविण्यांत आली.

या व्यतिरिक्त प्रांतिक आणि मध्यवर्ती सरकार निरनिराळ्या सहकारी बँकेचे भांडवल खरेदी करतात. सहकारी उत्पादनासाठीं उभारलेल्या कारखान्याला बरीच मोठी रक्कम कर्ज रूपानें देतात. इतकेंच नव्हे तर सहकाराचें तत्व लोकजीवनांत रुजावे यासाठीं ग्रॅटस, ग्रॅच्युइटी, सबसिडी सारख्या मदत नियंत्रणाहि सहकारी संस्थांना उपलब्ध करून देतात.

सहकाराबाबतची सरकारी वृत्ति अत्यंत सहानुभूतीची आहे हें द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील सहकारावर दृष्टीक्षेप टाकल्यास सहज कळून येते. दुसऱ्या पंच-

वार्षिक योजनेंत एकशे पन्नास कोटी रुपये अल्प मुदतीच्या कर्जांत व पंचवीस कोटी दीर्घ मुदतीच्या कर्जांत सरकारने गुंतवावयाचे आहेत. विस्ताराने मोठ्या अशा दहा हजार चारशें नवीन सहकारी संस्था, अठराशे मार्केटिंग सोसायट्या, पस्तीस साखर कारखाने व एकोणीसशें वखारी बांधण्यांत येणार आहेत. हा सर्व सहकारी तत्वावर उभारला जाणारा व्याप म्हणजे सरकारचा सहकाराशी पूर्ण सहकार होय.

सरकार सहकारा संबंधीं नवे नवे कायदे व त्यांतील कलमांत फेर बदल करते. नवीन नवीन नियमांनीं सहकाराचा विस्तृत प्रपंच बांधेसूद करण्याचा प्रयत्न करते. तसेंच सहकारी संस्थांचें हिशेब तपासून, त्याबाबत सूचना अथवा सल्ला देखील या संस्थांना देण्यांत येतो. या सर्व कृति मागे सरकारचा हेतू एकच दिसतो, तो म्हणजे सहकाराची वाढ शिस्तबद्धतेनें व्हावी; सहकारी प्रयत्नाला मोठ्या प्रमाणांत यश येवून तो ध्येय सिद्धीच्या आवारांत प्रविष्ट व्हावा.

भारतांत शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. सहकारी क्षेत्रांत साहजिकच अजाण मंडळींचाच भरणा आहे. त्यांना नीट संभाळून योग्य प्रकारें समज देवून त्यांच्यांत सहकारी वृत्ति निर्माण करावयास पाहिजे. ज्या अर्थी सहकारी चळवळीचा प्रारंभ सरकारनेंच केला व ज्या अर्थी सहकारी चळवळींवर सरकारी नियंत्रण आहे त्या

अर्थी सहकाराशीं संबंधित अधिकाऱ्यांनीं कार्य करतांना श्रद्धायुक्त प्रचारकाची वृत्ति स्वीकारली पाहिजे. ही प्रचारकाची वृत्ती अंगी बाणावयास विशिष्ट प्रकारचे शिक्षण आणि अनुभव हांशील करावयास हवा. अज्ञ नागरिकांना या अधिकाऱ्यांकडे जातांना चांगली वागणूक व योग्य मार्गदर्शनासंबंधी विश्वास वाटेल अशा प्रकारची अधिकाऱ्यांची कार्यपद्धति असावयास पाहिजे. तसेंच या कार्यासाठीं कचेरीचा दरवाजा सदानकदा उघडा असावा. थोडक्यांत सहकारी कचेऱ्या म्हणजे मंदिरें व सहकारी अधिकारी देवतास्वरूप वाटावे. असें झाले म्हणजे प्रत्येक सहकारी सभासद आपल्या अडिअडचणी अधिकाऱ्यांसमोर निर्भयतेनें व निःसंकोचपणे मांडतील व पुढचें पाऊल विश्वासानें टाकूं शकतील; कोणत्याही दुर्धर प्रसंगी त्यांना विश्वासांत घेवून त्यांच्यासमोर आपले हृदय मोकळे करतील.

सहकारी ध्येय संपादण्यासाठीं सरकार आटोकाट प्रयत्न व कोटयावधी रुपये खर्च करीत असल्यामुळें साहजिकच सरकारी नियंत्रण सहकारी चळवळीवर येतेच. तसेंच अज्ञ जनतेला कोणीही वाममार्गी लावून त्यांची फसवणूक करूं नये, म्हणूनही सरकारी नियंत्रणाची आवश्यकता सदहेतूपूर्वक करण्यांत आली. नियंत्रणाच्या या आवश्यकतेबाबत कुणाचाही विरोध नसावा. परन्तु या नियंत्रणाच्या मर्यादा व दर्जाही ठरलेला असावा.

नाहींतर नियंत्रणामुळें संपूर्ण सहकारी चळवळच सरकारी खातें बनण्याची शक्यता आहे. असें झाल्यास सहकार ध्येयच्यूत होईल. तेव्हां सरकारी नियंत्रणाची मर्यादा ठरली पाहिजे. या बाबतींत सर्व साधारण नियम असा मांडता येईल कीं नियंत्रण अशा मर्यादेपर्यंत असावें कीं ज्यामुळें सहकारी सभासदांची उपक्रमशीलता (Initiative) धोक्यांत येणार नाहीं. चुका ह्या होणारच. आजच्या चुका उद्यांच्या यशाची पायरी ठरूं शकतात. तेव्हां त्या चुका दुरुस्त करितांना समंजसपणा स्वीकारून त्या पुढच्या कारभारांत कशा टाळतां येतील हें समजूतदारपणानें सहकारी सभासदांच्या नजरेस आणून देण्याची कामगिरी नियंत्रण अधिकाऱ्यांना सुंदर तऱ्हेनें करिता येईल. सारांश, नियंत्रणांतूनच उपकारक ज्ञानाची निर्मिती झाली पाहिजे; उपक्रमशीलतेची गळचेपी नव्हे. तसेंच अधिकाऱ्यांपासून आपल्या चुका किंवा दोष लपवून ठेवण्याची गरज सहकारी सभासदांना कदापि वाटूं नये. ह्याचाच अर्थ असा कीं नियंत्रणाचा अवतार उग्र किंवा शासनकारी असूं नये. त्यापासून संशय व भीतीचें गढूळ वातावरण निर्माण होण्याची शक्यता असते, व हें सहकाराच्या मूल तत्त्वांशीं विसंगत आहे.

सहकारांत लोकशाही पद्धतीचा कारभार असल्यामुळें अधिकारपदासाठीं सभासदांमध्यें स्पर्धा असावयाच्याच. त्यांत पक्षोपक्ष निर्माण व्हावयाचेच. तेव्हां सहकारी अधि-

काऱ्यांनीं या स्थानिक राजकारणापासून अलग राहाण्याचें व्रत अंगिकारले पाहिजे. नाहींतर विरुद्ध पक्षीय मंडळी नियंत्रणाविषयीं कटुता निर्माण करतील व नियंत्रणाच्या दर्जावर शितोडे उडण्याचे प्रयत्न होतील. असें झाल्यास नियंत्रणेबद्दल उपकार भावना तर लुप्त होतीलच पण तिला बाजारी स्वरूप प्राप्त होईल. असें न होवूं देतां नियंत्रणेच्या दर्जाची पातळी सतत उच्च राखण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यामुळें अनिष्ट प्रकारांना आळा बसेल व समाज घातक व्यक्तींचें किंवा प्रथांचें पाय सहकारांत रुजणार नाहींत.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर व विशेषत: पंचवार्षिक योजनांच्या सुरवातीपासून केंद्र सरकार व राज्य सरकारांत सहकाराबद्दल विशेष महत्व प्राप्त झाल्यापासून अनेक भांडवलशाही वृत्तीच्या व्यक्तींनीं या चळवळीकडे पाय वळविल्याचें दिसते. भांडवलशाही वृत्तीचा अर्थ स्पष्टपणें असा होतो कीं पैसा व सत्ता यांचे समीकरण मांडावयाचे व पैशापासून सत्ता व सत्तेपासून पैसा मिळवावयाचा हा स्वार्थी हेतू या मंडळींचा असतो. सहकार ही एक कल्याणकारी रचना आहे. व समाज कल्याणावर तिचा कटाक्ष आहे. असें असल्यामुळें स्वार्थासाठी संस्था राबविण्याच्या वृत्तीचा त्यांत निषेध आहे. हा निषेध परिणामकारक रीतीनें दाखविण्यासाठीं असल्या लोकांना सहकारी चळवळीपासून दूर ठेवणे अगत्याचे आहे.

सहकारी चळवळीचा सरकारशी निकट संबंध असणे कदाचित् वावगे होणार नाहीं. परंतु सहकाराचा राजकारणाशीं मुळीच संबंध नको. लोकशाहीमध्यें अनेक राजकीय पक्ष असणे संभवते. लोकमताचा कौल केव्हां कोणत्या पक्षाचे बाजूनें पडेल व कोणता पक्ष अधिकार ग्रहण करील हें अनिश्चित असते. तसेंच अधिकारारूढ पक्ष निवडणूकींत हमखास यशस्वी होईलच हेंही सांगता यावयाचे नाहीं. एवंच राजकारणांतील यशापयशाचे माप अनिश्चित असल्यामुळें सहकारी चळवळीनें राजकारणापासून अलिप्त राहिलेले बरें. मजूरपक्षाशीं सहकारानें हात मिळवणी केली म्हणून सध्याचे इंग्लंडचें कॉन्झर्व्हेटिव्ह सरकार सहकारी चळवळीविषयीं उदासीन झालें आहे. म्हणून जीवनाशीं निगडित असलेल्या उपकारक संस्थांनीं संघर्षाचे प्रश्न व परिस्थिति टाळण्याचा शक्यतोंवर प्रयत्न करणेंच उचित. नाहींतर राजकारणाच्या वादळाबरोबर सहकारी चळवळही आंदोलित होईल व जीवनास अस्थिरता प्राप्त होईल.

## ८. कांहीं सहकारी आर्थिक रचना

सहकारी ग्राहक चळवळीचा उगम नफेबाजीच्या दुष्परिणामांतून झाला आहे. चांगला माल वाजवी भावांत न मिळणें, अडचणीचा फायदा घेवून भरमसाट किंमती वाढविणें, सांठेबाजी करून भावाची पातळी कृत्रिम रीतीनें वर चढविणें व असें करून ग्राहकांचा कोंडमारा करणें, या साऱ्या नफेबाजीच्या तऱ्हा आहेत. असल्या प्रकारास कंटाळून कांहीं ग्राहक एकत्र येतात. आपल्या समान अडचणींचा विचार करतात. चांगला माल वाजवी भावांत कोठें मिळतो हे हेरून तो मिळवितात. आपणांपैकीं एकाला या कामीं नियुक्त करतात व त्याच्यावर तो विकत घेवून घरोघर वांटप करण्याची जबाबदारी टाकतात. जसजसा हा ग्राहक संघ विस्तृत होत जातो तसतशीं त्याचीं स्थित्यंतरें होतात. प्रथम कोठे तरी घेतलेला माल ठेवण्यांत येवून तेथून त्याचे वांटप केले जाते व नंतर जसजशी या सहकारी यशाची किर्ती पसरते तसतसें या

स्थित्यंतराचें दुकानांत रुपांतर होते. हें ही चांगला माल व वाजवी भावांत मिळावा या तत्वावरच चालतें. ठोक दरानें घेवून किरकोळ दरांत विकल्यामुळें मिळणारा नफा कांहीं प्रमाणांत दुकानाच्या खर्चावर जातो.

चोख माल, वाजवी भाव, प्रामाणिक व्यवहार पद्धती, प्रमाणित वजनें–मापें वगैरे व रोखीचा व्यवहार यामुळें या दुकानाकडे नफेबाजीला कंटाळलेल्या ग्राहकांचा ओढा असणें सहाजिकच असते. चांगल्या गोष्टीचा गाजा-वाजा न करितांच प्रचार होतो. संतुष्ट गिऱ्हाईकच या दुकानाची कीर्ति पसरवितात. त्यामुळें एकाच्या अनुभवाचा फायदा दुसऱ्याला व दुसऱ्याच्या अनुभवाचा तिसऱ्याला या न्यायानें समाजांतील दूर दूरच्या ठिकाणीं हे लोण पसरविले जातें. परदेशांतील या बाबतींतील यशाचे आंकडे नयन दीपक आहेत म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. एकट्या स्टॉकहोम शहरांत सहकारी ग्राहक दुकानांचे १,६०,००० सभासद आहेत. या सहकारी दुकानांतून १९५४ सालीं जवळजवळ ४ अब्ज ६० कोटी रुपयांचा व्यवहार झाला. १९५५ सालीं एकट्या लंडन शहरांतील लंडन सहकारी संस्थेचे १२,१४,०३५ सभासद होते. या शहरांतील सहकारी संस्थांतून १९५५-५६ च्या पहिल्या चाळीस आठवड्यांत चार कोटी पंचवीस लक्ष पौंडाची माल विक्री झाली आणि हे सर्व औद्योगिक क्षेत्रांत प्रगति व भांडवलशाहीची लढावू स्पर्धा असतांना घडले आहे. स्लौ या इंग्लडांतील पाऊण लाख लोकवस्तीच्या

शहरांत सहकारी संस्थेचे २५००० सभासद आहेत. याचाच अर्थ असा कीं सारा गांवच सहकारी वृत्तीचा बनला आहे. यावरुन ग्राहक संस्थांची गरज व त्यांच्या भरभराटीची भरारी लक्षांत येईल. भारतांत या बाबतींतील प्रगति विशेष समाधानकारक नाहीं. आम्हांला असें वाटते कीं या देशांत या संस्था यशस्वी व्हावयाच्या असतील तर मालांचे निवडक प्रकारच, ज्यांचा जास्तीत जास्त खप होतो, असे या दुकानांतून ठेवावयास पाहिजेत. तसेंच निवडलेल्या मालाचा दर्जा ठरवून तो शक्यतों ठराविक वेष्टणांतून द्यावा म्हणजे लोकप्रिय व्हावयास अडचण पडणार नाहीं. ठराविक छापाचे वेष्टण म्हणजे हवा असलेल्या चांगल्या मालाची खात्री अशी त्याची किर्ती होईल. या वेष्टणांना येणारा खर्चही विशेष नाहीं. तो सरासरीनें हजाराला दोन या प्रमाणांत असतो.

असल्या प्रकारची दुकानें वाढीस लागल्यामुळें खाजगी धंदेवाल्यांना उपसर्ग पोंचतो व ते नाना तऱ्हेचे अडथळे उत्पन्न करतात. त्यांतील अत्यंत घातक म्हणजे निर्मात्याकडे सहकारी दुकानांत गिऱ्हाईकांना मिळणाऱ्या कमिशन विरूद्ध तक्रार करून त्यांना माल न मिळूं देण्याची गळ घालतात. इंग्लंडमध्यें याच कारणास्तव लोकप्रिय व स्वस्त दरांत मिळणारे नेकटाईज सहकारी दुकानांना मिळत नाहींत. अशा पेचप्रसंगातून सुटका म्हणून एकदां ग्राहक संस्थाचे जाळे निर्माण झाल्याबरोबर, ठोक खरेदी विक्री संघ व निर्मिती संस्था सहकारी तत्त्वावर चालवाव्या. असें झाल्यास

मानवी व्यवहाराची एक बाजू संपूर्णपणे सहकारी तत्त्वावर आधारली जाईल.

भारतांत या विभागांत होत असलेलें प्रयत्न पद्धतशीर नाहींत असेंच म्हणावे लागते. युद्धकालीन कापड, सिमेंट, लोखंड, अन्नधान्य आदींचें वांटप बहुतांशीं सहकारी पद्धतीनें करण्याचा आदेश सरकारकडून मिळाल्याबरोबर ग्राहक संस्थांना पूर आला. सहकाराला भरती आली. हें वांटप मोकळे झाल्याबरोबर भरती ओसरली व ग्राहक संस्थांची संख्या रोडावली. या सर्व प्रकारांत सहकारावरचा विश्वास किंवा सहकाराचें ध्येय गांठण्यासाठीं आवश्यक असलेले सातत्य याचा अभावच दिसतो. नाहींतर एकदां फोफावलेल्या संस्था रोडावण्याचें कांहींच कारण नव्हते.

आम्हांला या बाबतींत असें सुचवावेसें वाटतें कीं भारतांतील महिलांनी सहकारी ग्राहक संस्थांच्या उभारणीची व संचालनाची जबाबदारी स्वीकारावी. स्त्रियांच्या जीवनाला उपयुक्त चळवळ म्हणून तिच्याकडे बघावे. बाजार करणें स्त्रियांच्याच हातांत असल्यामुळें या चळवळीला स्त्रियांचा हातभार लागणें आवश्यक आहे.

अशा ग्राहक संस्था किंवा निर्मिती संस्था काढतांना किंवा त्याबरोबरच सहकारी संस्थांना लागणारा अल्पमुदतीचा, दीर्घ मुदतीचा किंवा मध्यम मुदतीचा पैसा

१०२३२
दा. क्र.
५१

पुरविणारी एखादी मध्यवर्ती अर्थव्यवस्था, बँक किंवा कॉर्पोरेशन असणें आवश्यक आहे. धंद्यास अनेक प्रकारे पैशाचें साह्य लागतें ते वेळीं न मिळाल्यास त्यास धोका उत्पन्न होतो. सहकारी चळवळीस भांडवलशाही अर्थ-रचनेपासून ही अपेक्षा करणें धोक्याचें होईल. सहकारी चळवळ योग्य मार्गानें व बिनदिक्कत प्रगतपर व्हावी अशा साठीं असली मध्यवर्ती संस्था सहकारी किंवा सरकारीच असावी. भारतांतील प्रत्येक राज्यांत सहकारी बँक आहे हें खरें पण शाखा विस्तारांतील कमतरता, अधिकाऱ्याचे शिक्षण, अनुभव, धडाडी व कार्यक्षमता यांतील दर्जा व सहकाराचा अपेक्षित विस्तार यांची सांगड घालतां आम्हांस असें सुचवावेसें वाटतें कीं सहकारी मध्यवर्ती संस्था म्हणून स्टेट बँकेचा उपयोग व्हावा. बँकिंगचा अनुभव, दक्ष संचालक वर्ग, कर्तव्यतत्पर तथा निवडक अधिकारी वर्ग, अमाप द्रव्य संचय, विशाल शाखा विस्तार या सर्व कारणांनीं सहकाराची जोपासना स्टेट बँक मार्फत जास्त प्रभावी व परिणामकारक रीतीनें होईल.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. वाढत्या लोक संख्येच्या तुलनेनें शेती फलदायी नाहीं. हवा पाण्याच्या रूसव्या-फुगव्यावर ती अवलंबून असल्यामुळें शेती व्यवहारांत अनिश्चितता शिरली आहे. या अनिश्चितते-मुळें अनेकदां उदरनिर्वाहाची सुद्धां पंचाईत पडते. यामुळें शेतकरी बहुधा उधार उसनवारीवर जगतो. युगानुयुगें असें झाल्यामुळें हिंदुस्थानचा शेतकरी कर्जबाजारी झाला

आहे. त्याची उत्पादनाची साधनें क्षीण बनली आहेत. या परिस्थितींतून सुटका म्हणून सहकारी क्रेडिट सोसायटया काढण्यांत आल्या. परंतु गरज व पुरवठा यांचा पुरेसा मेळ बसला नाहीं असें दिसते. कारण रूरल क्रेडिट सर्व्हेच्या अहवालाप्रमाणें शेंकडा साडे तीन टक्के गरज फक्त सहकारी पतपेढया भागवितात. उरलेल्या साडेशहाण्णव टक्क्या करितां त्याला इतरांच्या तोंडाकडे बघावे लागतें. या अवलंबनाचा फायदा धूर्त लोक घेवून त्याच्या दारिद्र्यांत भर पडत जातें.

या शिवाय इतर अनेक प्रकारच्या सहकारी संस्था काढण्यांत आल्या आहेत. त्यांची पूर्ण कल्पना परिशिष्टांत मिळेल.

———

## ९. सहकार आणि ग्रामदान

महात्मा गांधींनीं शासन–विरहित समाजाचें सुंदर ध्येय भारतापुढें उभे केले आहे. येवढी मोठी विशाल कल्पना पूर्णपणें अस्तित्वांत यावयास युगें लागावीत हें निर्विवाद. कारण असें होण्यास मानवी मनाच्या वृत्तीच पालटावयास हव्या. षड्रिपूंना त्यानें मनांतून हांकून द्यावयास पाहिजे. मनोनिग्रह व इंद्रियनिग्रह या दोन्हीं तत्वांचा अवलंब करावयास हवा. म्हणजेच थोडक्यांत मानवानें देवपण धारण करावयास पाहिजे. सर्वसाधारण व्यक्तींना ही अशक्य कोटींतील गोष्ट वाटावी इतकी तिची झेप आहे. परन्तु यक्षिणीची कांडी फिरल्याबरोबर ज्या प्रमाणें चमत्कार घडावा त्याप्रमाणें घटना घडल्या. महात्मा गांधींचें थोर अनुयायी आचार्य विनोबा भावे ह्यांनीं तेलंगणाच्या पायीं दौऱ्यांत भूदानाचा महामंत्र सांगून व पटवून भारताच्या सामाजिक जीवनांत मानवी मूल्याचे स्थान अतिशय बळकट केले. 'सबै भूमी गोपालकी' ह्या

संत वचनाचा उच्चार करीत विनोबानीं अखंड भारताचा पायीं प्रवास सुरूं केला. लक्षावधी एकर जमिनीची दानपत्रें त्यांच्या झोळींत पडली. अशा प्रकारें भूमिहीनांना मिळणाऱ्या जमिनींतून उत्पादनासाठीं लागणारी निर्मिती साधनें घेण्याकरितां ज्याच्याजवळ भूमि नाहीं अशा कडून मिळविलेलें संपत्ति–दान किंवा ज्यांच्याकडे जमिनही नाहीं व संपत्तिही नाहीं अशा कडून मागितलेले श्रमदान या सर्वांना मिळालेल्या यशाचा वांटा इतका मोठा आहे व प्रेमपूर्वक सहजतेनें मिळाला आहे कीं भूदान पुढाऱ्यांचा सामाजिक क्रांतीचा दावा खरा मानणे भाग पडते.

हें खरे असले तरी आमच्या मतें विनोबांनीं नव्यानेंच पुरस्कारलेली ग्रामदानाची कल्पना महात्मा गांधींचे शासन-विरहित समाज रचनेचे सुंदर स्वप्न आपणां सर्वांच्या हयातींतच साकार करील इतकी प्रभावी आहे. हे येथें नमूद करण्याचे कारण येवढेंच कीं या कल्पनेचा सहकाराशीं फारच अनुपम व परिणामी भाग्याचा असा मेळ बसू शकतो. जर असा मेळ घातला तर अशी कांहीं सुंदर समाज रचना तयार होईल व समाजाची ठेवण अशा कांहीं नैतिक पातळीवर जावून बसेल कीं त्यांतील मानवांना आजच्या तुलनेनें देवच मानावे लागेल.

ग्रामदानाची कल्पना आपण सर्वांना परिचित आहेच. एखाद्या गांवीं विनोबांचा मुक्काम असतांना त्या किंवा शेजारपाजारच्या गांवांतील संपूर्ण जमिनीची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. ५५
अनुक्रम 26583 वि: 2 १९ अंक
क्रमांक 1223 नों: दि: 26.3.60

मालकी असणारी मंडळी एकत्रितपणें त्या गांवातील संपूर्ण जमिनीची मालकी ग्रामदान पत्रानें विनोबांना अर्पण करतात. अशा तऱ्हेनें त्या दिवसापासून त्या जमिनीची मालकी वैयक्तिक कोणाकडे न राहता ती संपूर्ण गांवकऱ्यांकडे जाते. यापुढें ही जमीन कोणालाहि विकता येणार नाहीं; किंवा वारसा हक्कानें मिळविता यावयाची नाहीं.

अशा रीतीनें मिळविलेल्या गांवाची व्यवस्था कशी असावी या संबंधींचें धोरण प्रयोगावस्थेंत असले तरीपण येवढे मात्र नक्की कीं ती व्यवस्था सर्वोदय तत्वानें व गांवकऱ्यांनींच करावयाची आहे. आमच्या मतें ही व्यवस्था सहकारी पद्धतीनें केल्यास फारच बहारीची, राष्ट्रीय जीवनास उपकारक व गांधीवादास धरून होईल. सहकारालाही एक नवे पण प्रभावी क्षेत्र प्राप्त होईल.

ग्रामदानांत मिळालेल्या प्रत्येक गांवात एक विविध-कार्य सहकारी संस्था स्थापावी. ह्या संस्थेचे सभासद म्हणून गांवांतील सर्व सज्ञान स्त्रीपुरुषांची नोंद करून घ्यावी. या संस्थेच्या कार्य-कारिणींत कमीतकमी निम्मे सभासद लिहिता वाचतां येणारे असावेत. गांव सोडून जाणाऱ्या सभासदांचे सभासदत्व आपोआपच रद्द व्हावे. सभासदांनीं प्रत्येकाच्या कुवतीप्रमाणें या सहकारी कार्यास हातभार लावावा व या सहकारी संस्थेनें प्रत्येक सभासदाला त्याच्या अन्नवस्त्र व निवाऱ्याच्या गरजा पुरविण्याचा प्रयत्न करावा. जे जे महत्वाचे सामाजिक कृत्य वा समारंभ (लग्न, उत्सव,

करमणूक कार्यक्रम वगैरे) करावयाचे असेल ते सर्व सामुदायिक पद्धतीनें आगावू ठरवून करावेत.

प्रत्येक सभासदाला व त्यावर अवलंबून राहणाऱ्या मुलांबाळांना पुरेल इतके अन्न या सहकारी संस्थेनें या गांवांतून निर्माण केलेच पाहिजे. वाढत्या लोकसंख्येचा ताण सहन करता यावा म्हणून प्रत्येक सभासदानें आपल्या करिता सांडपाण्यावर जगणाऱ्या शेंगा देणाऱ्या वेली किंवा दुधी, भोपळा, तोंडली वगैरे फळभाज्या किंवा शेवगा, अगस्ता, पपई इत्यादि व अन्नधान्यास पूरक होणाऱ्या भाजीपाल्यासारख्या वनस्पती लावाव्यात. वस्तीच्या भागांत परसाची जागा कमी पडेल तर पावसाळ्यांत शेतांच्या बांधावर व तदनंतर तळ्याच्या पोटांत किंवा गांव विहीरीचें सांडपाणी मिळेल अशा जागेंत हा भाजीपाला लावावा. तसेंच या संस्थेनें गांवांत आंब्याची, कवठाची, मोसंबीची संत्र्याची, केळीची, पेरुची, बोरांची, चिंचांची, सीताफळांची वगैरे झाडें लावावींत. त्यांच्यापासून मिळणाऱ्या फळांचाही पूरक अन्न म्हणून उपयोग करावा म्हणजे अन्नधान्याची टंचाई भासणार नाहीं. गांवांतील तळ्यांत शिंगाडे लावावे व तळ्याच्या पाण्यांत सांपडणारे मासे तसेंच सहकारी संस्थेनें पाळलेल्या गाई म्हशींच्या दुधाचा व कोंबड्या बकऱ्या वगैरेचाही पूरक अन्न म्हणून उपयोग करावा. तसेंच गांवांत उत्पन्न होणाऱ्या कडधान्यांचा वापर अधिक प्रमाणांत करण्यास शिकवावे.

स्वावलंबन हा सहकाराचा उद्देश असल्यामुळें प्रत्येक घरांत एकेक चरखा घेवून फुरसतीच्या वेळीं सूत कताई करावी. त्यापासून आवश्यक अशा कपड्यांची निर्मिती सहजच होईल.

याच सहकारी संस्थेनें उर्वरित धान्य अथवा व्यापारी पीकांच्या योग्य मोबदल्यांत सभासदांना लागणारे धान्येतर पदार्थ म्हणजे मीठ, साखर, गूळ, तेल, साबण, सुपारी, तंबाखू, चहा, पादत्राणें वगैरे आवश्यक जिन्नस खरेदी करावेत व ते सभासद कुटुंबांच्या गरजेप्रमाणें पुरवावेत. असें झाल्यास अन्न वस्त्रादिकांचा तुटवडा पडणार नाहीं. भारतांतील पांच लाख खेड्यांत वर सांगितल्याप्रमाणें स्वावलंबनाचा प्रयत्न झाला तर ग्रामीण भागांत दिसून येणारे दैन्य व वैतागाची भावना दूर होण्यास वेळ लागणार नाहीं.

मालकी हक्काचा प्रश्न ग्रामदानानें सुटल्यामुळें भांडणाचे मूळच नाहीसें होईल. तसेंच सहकारी पद्धतीची कारभार व्यवस्था झाल्यामुळे गांवांतील मंडळींत परस्पर सलोखा व विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. शेताच्या एका तुकड्यापेक्षां संपूर्ण गांवच आपली कर्मभूमी आहे या विश्वासामुळें गांवकऱ्यांमध्यें सामुदायिक भावना निर्माण होईल व प्रत्येक गांवकरी गांवाच्या हितासंबंधीं जागृत राहील. पडायला आलेल्या घरांची

डागडुजी सर्व मिळून करतील. गांवाबाहेरच्या सडकेशी गांवाचा संबंध जोडणारा रस्ता सर्वांच्या श्रमाने बनेल. गांवाची व गांवांतील देवळें वगैरे सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता राखणें गांवकऱ्यांचे सामुदायिक कार्य बनेल. या सर्व कार्यांत भाग घेणाऱ्यांना पुरेसे अन्नवस्त्र व सुरक्षित जीवन मिळणार असल्यामुळें कुणीही काम-चुकारपणा करण्याचा प्रयत्न करणार नाहीं, किंवा समाजविरोधी कारवायाही करणार नाहीं.

या विविधकार्य सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीनें होईल. निवडलेले प्रतिनिधी दरवर्षी एक तृतियांश याप्रमाणें निवृत्त होतील. ज्यांना लिहितां वाचतां येत नाहीं अशा प्रतिनिधींना एका वर्षांत पुरेसे लिहितां वाचतां येईल असें शिक्षण देण्याची जबाबदारी सुशिक्षित प्रतिनिधींवर टाकावी. ग्रामपंचायतीचे सर्व अधिकारही याच प्रतिनिधी मंडळाकडे सोंपविण्यांत आले, तर फारच छान होईल.

अन्नवस्त्र व निवारा यांच्यापुरते धान्य वगळून उरलेले धान्य सरकारनें योग्य मोबदला देवून विकत घ्यावे. त्या रकमेपैकीं पंचेविसावा हिस्सा त्या गांवाचा वायदा व राखीव निधी म्हणून सरकारनें आपल्या जवळ ठेवावा. व उरलेल्या रकमेंतून त्या गांवच्या व्यवस्थापकांनीं गांवच्या व गांवांतील लोकांच्या सामुदायिक गरजा भागविण्याचा प्रयत्न करावा.


अशा ह्या सहकारी ग्रामराज्यास मदत म्हणून राज्य व मध्यवर्ती सरकारनें आपला वांटा अवश्य उचलावयास पाहिजे. प्राथमिक शिक्षण, आरोग्य, संरक्षण, दळणवळणाचीं साधनें, पोस्ट, तारा, टेलिफोन, वीज, पाणी पुरवठा वगैरेची व्यवस्था साहजिकपणें सरकारच करूं शकेल. कारण ही सारी कोणत्या तरी एका मध्यवर्ती योजनेची विविध अंगें होतील.

आमच्या मतें व आचार्य विनोबा भावे आणि त्यांचे सहकारी यांना मान्य असल्यास या पद्धतीच्या व्यवस्थेंतून भारतांतील ग्रामीण जीवनांत म्हणजे शेंकडा ८० लोकांत रामराज्य स्थापिले जाईल. तेव्हां सहकाराची शक्ति व ग्रामदानाची स्फूर्ति यांतून महात्मा गांधींचें शासन विरहित किंवा अल्पशासित सर्वोदयाचे भव्य स्वप्न आपल्या हयातींतच साकार होईल हें सांगावयास ज्योतिषी नको.

REFBK-0010232
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 26463 वि: निबंध
क्रमांक 7223 नों. दि:
ग्रा. क. 90232

# परिशिष्ट

## * सहकारी चळवळीची रचना




* रजिस्ट्रार कोऑपरेरिव्ह सोसायटीच्या सौजन्यानें